cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–३३ मंगळवार दि.१४ मे २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

गंभीर : न्याय झाला नसल्याची न्यायालयासच जाणीव

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येला तब्बल ११ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतर या प्रकरणाचा निकाल अखेर लागला. विशेष न्यायालयाने या प्रकरणातील दोन आरोपी सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आणि प्रत्येकी पाच लाख रुपयांचा दंडही ठोठावला.

ईव्हीएम–व्हीव्हीपॅट प्रकरण पुन्हा सर्वोच्च न्यायालयात

नवी दिल्ली:ईव्हीएम–व्हीव्हीपॅट प्रकरणातील निकालाला आव्हान देणारी पुनर्विचार याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. फेटाळण्यात आलेल्या याचिकांमध्ये व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट) रेकॉर्डसह इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) डेटाच्या १०० टक्के क्रॉस–व्हेरिफिकेशनची मागणी करण्यात आली होती. अरुण कुमार अग्रवाल यांनी ही याचिका दाखल केली असून, निकालात स्पष्ट झालेल्या त्रुटी असल्याचा दावा केला आहे.

मतदान केंद्रांवर शेतकऱ्यांचा संताप

कांद्याची माळ घालून केले मतदान!

पुणे । प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसांपासून पेटता असलेला कांद्याचा प्रश्न अद्यापही लाल फितीत अडकून आहे. निर्यात खुली करूनही अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. अशातच सोमवारी राज्यासह देशात चौथ्या टप्प्यातील लोकसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडली. याच पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी रोष व्यक्त कारण्यासाठी

प्रशासकीय अधिकाऱ्यांची तारांबळ

अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यात उस्थळ दुमाला येथील कांदा उत्पादक शेतकरी त्रिंबक भदगले यांनी गळ्यात कांद्याची माळ घालून मतदान केले. यावेळी मतदान केंद्रावर प्रशासकीय अधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. यावेळी कांद्याला व दुधाला भाव नसल्याने सरकारचा निषेध व्यक्त करण्यात आला.

कांद्याची माळ घालून मतदान केले असल्याचे पाहायला मिळाले आहे.

राज्यात प्रामुख्याने जळगावसह, अहमदनगर, पुणे जिल्ह्यातील तीन मतदार संघांसह अकरा जागांवर मतदान झाले. मतदानाच्या वेळी चोपडा येथे गळ्यात कांद्याची माळ घालून शेतकरी संघटनेचे पदाधिकारी संदीप पाटील यांनी मतदानाचा हक्क बजावला. तर अहमदनगर जिल्ह्यात देखील एका मतदाराने गळ्यात कांद्याची माळ घालू मतदान केले आहे. याशिवाय अहमदनगर जिल्ह्यात श्रीगोंदा तालुक्यातील टाकळी लोणार येथेही असाच प्रकार घडला असल्याचे समोर आले ◀◀ पान २ वर

केंद्रात सरकार आल्यास मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा–काँग्रेस

नवी दिल्ली । वृतसंस्था

देशात इंडिया आघाडीचे सरकार आल्यास 'मराठी' भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात येईल, अशी मोठी घोषणा काँग्रेसने केली आहे. यापूर्वी आठवडाभरात दोन वेळा केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा का दिला नाही, असा प्रश्न काँग्रेसने विचारला होता. त्यांनतर काँग्रेसने लोकसभा निवडणुकीसाठी चौथ्या टप्प्याचे मतदान होत असताना आज (दि.१३) ही मोठी घोषणा केली आहे.

गेल्या दहा वर्षात 'मराठी' भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची मागणी केंद्र सरकारकडे प्रलंबित आहे, असे असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा का दिला नाही? असा प्रश्न लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर दोनदा काँग्रेसने विचारला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा मुद्दा ◀◀ पान २ वर

मराठा-ओबीसींच्या चुरशीत मतदानाचा टक्का वाढला

बीड जिल्ह्यात सरासरी ६८ टक्के मतदान, ४१ उमेदवारांचे भवितव्य यंत्रात बंद

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभेसाठी सोमवार दि.१३ मे रोजी मतदान झाले. राज्यात इतर ठिकाणी मतदानाच टक्का कमी होत असताना बीडमध्ये मात्र मतदानाचा टक्का वाढल्याचे दिसून आले आहे. मराठा आणि ओबीसी यांच्यात चुरस असल्या कारणाने हा मतांचा टक्का वाढला असल्याचे सांगण्यात येत असून, जिल्ह्यात सरासरी ६८ टक्के मतदान झाले आहे. यासोबतच बीड लोकसभेसाठी उभा ठाकलेल्या ४१ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. आता ४ जून रोजी मतमोजणी होणार असून, कोण बाजी मारणार याची चर्चा जिल्ह्यात सुरू झाली आहे.

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आपल्या कुटूंबीयांसह आपल्या गावी नाथ्रा येथे मतदानाचा हक्क बजावला.

महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी आपल्या गावी मतदानाचा हक्क बजावला.

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी सपत्नीक बजावला मतदानाचा अधिकार

चौथ्या टप्प्यामध्ये बीड लोकसभेसाठी दि. १३ मे रोजी मतदान पार पडले. कधी नव्हे ते यावर्षी बीड जिल्ह्याची लोकसभा निवडणूक अत्यंत चुरशीची होत आहे. या निवडणुकीमध्ये जातीपातीचा मुद्दा अत्यंत प्रखरपणे दिसून आला. मराठा योद्धा जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी उभा केलेले आंदोलन आणि या अनुषंगाने त्यांनी भाजप सरकारवर केलेली टीका यामुळे जिल्ह्यातील मराठा बांधवाने भाजप उमेदवाराला विरोध करण्यास पहिल्यापासूनच सुरुवात केली. याशिवाय भाजपच्या उमेदवार असलेल्या पंकजाताई मुंडे या ओबीसी मधून येतात तर महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे मराठा समाजाचे आहेत. यामुळे मराठा– ओबीसी वाद या निवडणुकीत चांगलाच उफाळून आला. दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांकडून टोकाचे आरोप प्रत्यारोप करण्यात आले. आपल्या उमेदवाराला अधिकाधीक मते मिळावेत यासाठी, नेते, कार्यकर्ते कामाला लागले होते. गावागावात मराठा– ओबीसी वादाची किनार असल्याने या चुरशी मधून जिल्ह्यामध्ये मतदानाचा टक्का वाढला असल्याचे दिसले. यापूर्वी मतदानाच्या तीन टप्प्यात राज्यात मतांचा टक्का कमी झाल्याचे दिसून आले होते, त्या पार्श्वभूमीवर चौथ्या टप्प्यात कसे मतदान होते याकडे लक्ष लागले होते. बीड जिल्ह्यातही मतदान किती होईल याबाबत अनेकांना शंका होत्या. दुसरीकडे प्रशासनाने मात्र मोठ्या प्रमाणावर मतदान जागृती केली होती. असे असतानाच या निवडणुकीत असलेली चुरस मतदानाचा टक्का वाढविण्यास कारणीभूत ठरली. जिल्ह्यामध्ये सुमारे सरासरी ६८ टक्के मतदान झाले.

मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. या यामध्ये आष्टी ६९%, बीड% ६८, गेवराई ६५%, केज ६८%., माजलगाव ६८%, परळी ७५% विधानसभा मतदार संघात मतदान झाले. मतदानासाठी सकाळपासूनच मतदारांमध्ये ◀◀ पान २ वर

साठवण तलाव न झाल्याने कोरडेवाडीतील ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्कार

केज तालुक्यातील कोरडेवाडी येथील साठवण तलावाचा सर्व्हे करून २५ वर्ष उलटले तरी काम मार्गी लागले नाही. यासाठी कोरडेवाडी येथील २ हजार १०० मतदारांनी लोकसभा निवडणूकीवर बहिष्कार टाकल्याचे दिसून आले. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसह तहसिलदार अभिजीत जगताप यांनी मनधरणी करूनही त्यांना यश आले नाही. त्यामुळे मतदान केंद्रावरील अधिकारी, कर्मचारी दिवसभर केंद्रात बसून राहीले. मात्र एकही मतदार मतदान केंद्राकडे फिरकला नाही.

राज्यात ५२.४६ टक्के मतदान

राज्यात आज चौथ्या टप्यातील राज्यातील ११ मतदारसंघात मतदान पार पडले. यात नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी, बीड या राज्यातील लोकसभा जागा आहेत. या मतदारसंघांत दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. ११ लोकसभेच्या मतदारसंघात सायंकाळी ५ वाजेपर्यंतची मतदानाची टक्केवारी समोर आली असून, राज्यात सरासरी ५२.४६ टक्के मतदान झाल्याचे समोर आले आहे.

काही केंद्रावर फेर मतदान घेण्याची बजरंग सोनवणे यांची मागणी

सोमवारी मतदानाच्या दिवशी मतदान सुरू झाल्यानंतर एक तासामध्ये परळी मतदारसंघातील इंजेगाव सारडगाव धर्मपुरी दिग्रस नाथरा कवडगाव सावळा जिरेवाडी वालेवाडी व कनेरवाडी तर केज तालुक्यातील देवगाव लाडे वडगाव माजलगाव मधील गोविंदवाडी व धारूर तालुक्यातील सोनीमोहा पिंपळवडा मैंदवाडी आणि चाडगाव आणि आष्टी मधील वाली आणि पाटोद्या तालुक्यातील वाघेरा येथे बोगस मतदान झाले असल्याचा आरोप करीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी मुख्य निवडणूक आयुक्त यांना पत्र पाठवून, यावरील ठिकाणी इन कॅमेरा फेर मतदान घेण्याची मागणी केली आहे.

चौथ्या टप्प्यातल्या राज्यातील लढती

१) पुणे – मुरलीधर मोहोळ (भाजपा) विरुद्ध रविंद्र धंगेकर (काँग्रेस). २) बीड – पंकजा मुंडे (भाजपा) विरुद्ध बजरंग सोनावणे (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष). ३) शिरुर – अमोल कोल्हे (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष) विरुद्ध शिवाजीराव आढळराव पाटील (राष्ट्रवादी). ४) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) – संदिपान भुमरे (शिवसेना), चंद्रकांत खैरे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष),इम्तियाज जलील (एआयएमआयएम). ५) जालना – रावसाहेब दानवे (भाजपा) विरुद्ध कल्याण काळे (काँग्रेस). ६) अहमदनगर – सुजय विखे–पाटील (भाजपा) विरुद्ध नीलेश लंके (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष). ७) मावळ – श्रीरंग बारणे (शिवसेना) विरुद्ध संजोग वाघेरे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष). ८) शिर्डी – सदाशिव लोखंडे (शिवसेना), भाऊसाहेब वाकचौरे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), उत्कर्षा रुपवते (वंचित बहुजन आघाडी). ९) रावेर – रक्षा खडसे (भाजपा) विरुद्ध श्रीराम पाटील (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष). १०) जळगाव – स्मिता वाघ (भाजपा) विरुद्ध करण पवार (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष). ११) नंदुरबार – हिना गावित (भाजपा) विरुद्ध गोवल पाडवी (काँग्रेस).

तांत्रिक बिघाडामुळ २६ ठिकाणी मशीन बदल

मतदान प्रक्रिया पार पडत असताना काही ठिकाणी मशीन मध्ये अडचणी आल्याचे दिसून आले. जिल्ह्यात मतदानाच्या सुरुवातीलाच २६ बुथवर वरील मशीन तांत्रिक कारणामुळे बदलण्यात आल्या. ८ कंट्रोल युनिटमध्येही बदल करण्यात आले. याशिवाय १८ व्हीव्हीपॅटही बदलण्यात आले.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.९ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : ४४.०० क्विंटल			
	२,२५०	२,६७०	
ज्वारी/हायब्रिड : १६५.५० क्विंटल			
	१,७००	३,५८०	२,४८८
मूग : ०.५० क्विंटल			
	९,८५०	९,८५०	९,८५०
तूर : ८०.०० क्विंटल			
	४,५००	१०,९६३	
उडीद : ५.५० क्विंटल			
	७,९००	७,९०१	७,९००
बाजरी: ७९.५० क्विंटल			
	२,०८५	२,८०१	२,४७७
चिंच/लोकल: १०.०० क्विंटल			
	६,५००	६,५००	६,५००
सोयाबीन: २१६.०० क्विंटल			
	४,५७५	४,६०१	४,५८५
हरभरा: ५.०० क्विंटल			
	५,६००	६,१००	५,७८७

निवडणुकीत भाजप रोजगारावर गप्प का?

राहुल गांधी यांचा घणाघात

नवी दिल्ली । वृतसंस्था

निवडणुकीतील सर्वात मोठा मुद्दा रोजगाराचा आहे. देशात तरुणांना रोजगार नाही. एकीकडे काँग्रेस संविधान रक्षण आणि बेरोजगारीबद्दल बोलत आहे. मात्र, भाजप निवडणूक प्रचारात यावर काही बोलत नाही,'' असे म्हणत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बेरोजगारीवरून केंद्रातील सरकारवर जोरदार घणाघात केला.

दिल्लीत न्याय मंचच्या कार्यक्रमात अध्यक्ष राहुल गांधींनी तरुणांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, ''विमानतळ सरकारद्वारे बनवले जाते आणि ते अदानींना भेट दिले जाते. देशातील बंदरे, विमानतळ आणि पायाभूत सुविधांबाबत हेच घडत आहे. देशात मोजक्या लोकांना कंत्राटे दिली जात आहेत. देशाचा पैसा मागास, दलित, आदिवासी आणि गरीब सर्वसामान्य वर्गाच्या खिशातून काढून मोजक्या लोकांकडे जात आहे. त्यामुळे काँग्रेसच्या जाहीरनाम्यात महिला आणि तरुणांसाठी संधी निर्माण करण्याचे मार्ग सांगितले आहेत, असे ते म्हणाले. पुढे राहुल गांधी म्हणाले की, ''देशातील सर्वात मोठ्या २०० कंपन्यांच्या व्यवस्थापनात एकही मागास, दलित, आदिवासी आणि गरीब सामान्य वर्गातील व्यक्ती नाही. देशातील ९० टक्के तरुण नोकरीसाठी विविध परीक्षेला बसून नोकरीच्या शोधात थकून जात आहे. मात्र, त्याला नोकरी मिळत नाही. मागासवर्गीय, दलित, आदिवासी आणि सर्वसामान्य प्रवर्गातील गरीबांना उपलब्ध असलेल्या संधी संपवल्या जात आहेत.''

१५ ऑगस्टपर्यंत ३० लाख रिक्त पदे भरू

काँग्रेसच्या जाहीरनाम्यात तरुणांना दिलेल्या आश्वासनांचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले की, ''केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार स्थापन झाल्यास १५ ऑगस्टपर्यंत ३० लाख रिक्त सरकारी पदे भरण्याचे काम सुरू होईल. २५ वर्षांखालील पदविका किंवा पदवीधर तरुणांना सरकारी किंवा खासगी क्षेत्रात शिकाऊ प्रशिक्षण दिले जाईल. या तरुणांना वर्षभरात एक लाख रुपयांची म्हणजे महिन्याला साडे आठ हजार रुपयांची मदत मिळणार आहे. पेपरफुटीपासून मुक्ततेच्या गॅरंटी अंतर्गत पेपरफुटीविरोधात कडक कायदा केला जाईल,'' असेही ते म्हणाले. दरम्यान, या कार्क्रमाला मोठ्? प्रमाणात विद्यार्थी, युवक उपस्थित होते.

वार्तांकनासाठी आलेल्या मुंबईतील पत्रकाराचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मुंबई वरून एका वृत्तवाहिनीसाठी लाईव्ह वार्तांकन करण्यासाठी अंबाजोगाई येथे आलेल्या पत्रकाराचे एका बुथवर वार्तांकना दरम्यान हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. ही घटना दि.१३ मे रोजी सकाळच्या सुमारास घडली. वैभव कनघुटकर असे त्यांचे नाव आहे.

घोडबंदर ठाणे येथे राहणारे वैभव कनघुटकर वय ४५ हे मुंबईवरून आज तक या वाहिनीसाठी लाईव्ह वार्तांकन करण्यासाठी अंबाजोगाई येथे रविवारी रात्री मुंबईहून आलेल्या पत्रकारांसोबत मुक्कामी होते. सकाळी सात वाजता बाहेर पडून लाईव्ह वार्तांकन केल्यानंतर पंचायत समिती आंबेजोगाई येथील बुथवर वार्तांकन करण्यासाठी ते गेले असता अस्वस्थ वाटू लागले. त्यावेळी त्यांनी ड्रायव्हर असलेल्या मित्रास ॲसिडिटीची गोळी आणण्यास पाठविले मात्र वेदना तीव्र झाल्याने त्यांना इतर पत्रकार बांधवांनी जवळच असलेल्या हॉस्पिटल मध्ये नेले. मात्र, तेथील डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारासाठी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय येथे घेऊन जाण्यास सांगितले. त्यांना तात्काळ स्वाराती मध्ये नेण्यात आले मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

घरदार सोडून लाईव्ह वार्तांकन करण्यासाठी आलेल्या पत्रकार वैभव यांचे दुःखद निधन झाल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली असा परिवार असून, त्यांचे शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेह ठाणे येथे पाठविला जाणार आहे व तेथेच त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत. सकाळी सकाळी नऊ वाजता नाथ्रा येथे पंकजा मुंडे यांचे मतदान करतानाचे लाईव्ह वार्तांकन सर्व न्यूज चैनल च्या टीमला करायचे होते ते तीन गाड्या सह आठ ते दहा लोक आले होते. मात्र वैभव कनगुटकर यांच्या अकाली निधनाने हे सर्व वार्तांकन स्थगित करण्यात आले. विशेष म्हणजे रविवारी रात्रीच पत्रकार वैभव यांच्या पत्नीचा वाढदिवस होता. वाढदिवसामुळे पत्नीशी व्हिडिओ कॉलवर वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन ते रात्री झोपले होते आणि आज सकाळी त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबीयांसाठी हा मोठा आघात आहे.

cmyk

अग्रलेख

गंभीर : न्याय झाला नसल्याची न्यायालयासच जाणीव

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येला तब्बल ११ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतर या प्रकरणाचा निकाल अखेर लागला. विशेष न्यायालयाने या प्रकरणातील दोन आरोपी सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आणि प्रत्येकी पाच लाख रुपयांचा दंडही ठोठावला. मात्र, तीन अरोपींची पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली. 'आरोपी डॉ. वीरेंद्रसिंह तावडे याने गुन्ह्याचा कट रचल्याच्या संशयाला वाव असला, तरी तो पुराव्याद्वारे सिद्ध करण्यात सरकार पक्षाला अपयश आले आहे,' असे न्यायालयानेच निकाल देताना नमूद केले आहे. याचाच अर्थ या हत्येच्या कटाचे सूत्रधार मोकाटच असल्याचे व हे तपास यंत्रणांचेच सपशेल अपयश असल्याचे न्यायालयानेच अप्रत्यक्षरीत्या मान्य केले आहे. त्यामुळे अकरा वर्षांनंतरही या प्रकरणाचा केवळ निकालच लागला, न्याय झाला नाही, असेच दुर्दैवाने म्हणावे लागते.

आरोपींवर विघातक कारवाया प्रतिबंधक कायद्याचे कलम लावतानाही तपास अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा केल्याचे ताशेरेही विशेष न्यायाधीश पी.पी. जाधव यांनी निकाल देताना ओढले. थोडक्यात या हत्या प्रकरणाचा निकाल देताना स्वत: न्यायालयासच या प्रकरणात न्याय झाला नसल्याची जाणीव झाली व न्यायालयाने ती निकाल देताना नमूदही केली. न्यायालयाचे कामकाज एका विशिष्ट चौकटीत चालते. ही चौकट भक्कम, बांधेसूद आणि चिरेबंदी करण्याचे काम तपास यंत्रणा व सरकार पक्षाचे असते. तेथेच कच्चे दुवे राहिले तर न्यायालय तरी संपूर्ण न्याय कसा करणार? न्यायालयाने तपास यंत्रणांवर ओढलेल्या ताशेऱ्यांमधून हेच अधोरेखित होते की, तपास यंत्रणा, सरकार पक्षाने सुरुवातीपासूनच हे प्रकरण ज्या गांभीर्याने हाताळायला हवे ते गांभीर्य बाळगले नाही. डॉ. दाभोलकरांची हत्या ही एका व्यक्तीची हत्या नव्हती तर तो एका विचारसरणीचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न होता. महाराष्ट्रातील विवेकाचा स्वर दाबण्याचाच तो प्रयत्न होता. त्यामुळे सर्व पक्षांच्या सत्ताधाऱ्यांनी या विचारसरणीला न्याय मिळवून देण्याची इच्छाशक्ती दाखवायला हवी होती. मग तपास यंत्रणांनीही पूर्ण गांभीर्याने योग्य तपास करून आरोपींना पकडण्याचे व त्यांच्याविरोधात भक्कम पुरावे गोळा करण्याचे आपले कर्तव्य पार पाडले असते. ही इच्छाशक्ती न दाखविली गेल्याने डॉ. दाभोलकर यांच्यानंतर आणखी तीन जीव या समाजद्रोही कटाचे बळी ठरले. डॉ. दाभोलकर यांच्यासहित चार जणांची झालेली अमानुष हत्या हा एका विचारसरणीविरुद्धचा समाजद्रोही कटच होता. डॉ.दाभोलकरांच्या हत्येनंतर महाराष्ट्र सरकार खडबडून जागे झाले असते तर बाकीचे तिघे वाचले असते व हा समाजद्रोही कट उधळून तो रचणाऱ्यांच्या मुसक्या आवळता आल्या असत्या. तसे झाले नाही. उलट कर्नाटक पोलिसांच्या सक्रियतेमुळे दाभोलकर, पानसरेंच्या हत्येचे धागेदोरे गवसले. तरी देखील दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेल्या पाचही आरोपींविरुद्ध सबळ पुरावे जमा करण्यात तपास यंत्रणांना यश आले नाहीच. यामुळे या कारस्थानाला काही अटकाव झाला आहे, याचे समाधान डॉ. दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणाच्या लागलेल्या निकालातून अजिबात मिळत नाही. त्यामुळे पुरोगामी म्हणवल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात विवेकी विचारसरणीला न्याय कधी मिळणार? हा प्रश्न या निकालानंतरही कायमच राहतो. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीच्या पुढील वाटचालीला कार्यक्षम तपासकाम, न्यायालयीन प्रक्रिया आणि न्याय याचा आधार मिळायला हवा होता. तो या प्रकरणाच्या निकालातून मिळालेला नाही व हे पूर्णपणे तपासयंत्रणा व सरकार पक्षाचेच अपयश आहे, हे येथे सखेद नमूद करावे लागते. मुळात डॉ. दाभोलकरांची हत्या झाल्यापासून तपासाची हेळसांडच झालेली आहे.

काही काळ तर या तपासाला कुठलीही दिशाच नव्हती. जे दाभोलकर आयुष्यभर अंधश्रद्धेविरुद्ध लढले त्या दाभोलकरांचे मारेकरी सापडावेत म्हणून 'प्लँचेट' करण्याची बुद्धी पोलिस अधिकाऱ्यांना व्हावी, हा तपास यंत्रणेच्या भंपकगिरीचा कळसच. राज्य आणि केंद्र पातळीवरील पाच ते सहा तपास यंत्रणांनी लक्ष घातलेल्या या प्रकरणात सूत्रधार सापडू नयेत, सापडलेल्या सर्व आरोपींना कडक शिक्षा होईल, एवढे भक्कम पुरावे अकरा वर्षांत तपास यंत्रणांना सापडू नयेत, हे अनाकलनीय व लज्जास्पदच आहे. सलमान खान त्याच्या घरात हजर नसताना त्याच्या घराच्या भिंतीवर झालेल्या गोळीबाराच्या प्रकरणावर आकाश-पाताळ एक करणाऱ्या तपास यंत्रणा व सरकारी पक्षाची कार्यक्षमता डॉ. दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या हत्याप्रकरणांमध्ये कुठे गायब होते? हा प्रश्नच! त्यामुळे डॉ.दाभोलकर यांच्यासह चौघांची हत्या करून विवेकवादी विचारसरणीचा आवाज दाबण्याचा समाजद्रोही कट करणारा सूत्रधार कोण? असे विषारी विचार पेरणाऱ्यांची पाळेमुळे उखडली जाणार की नाही? हे प्रश्न दाभोलकर हत्या प्रकरणाच्या निकालानंतरही कायम आहेत.

निकालानंतर दोन्ही बाजूंनी या निकालास वरच्या न्यायालयात आव्हान देणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. तेथे काय निकाल लागायचा तो लागेलच. मात्र, त्यामुळे दाभोलकर वा इतरांना धर्मद्रोही ठरवून त्यांना शिक्षा देण्याचे काम तुमचे आहे असे विषारी विचार पसरविणाऱ्या तथाकथित आध्यात्मिक गुरू किंवा धर्मांध संघटना यांना शिक्षा कशी मिळणार? हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. डॉ.दाभोलकर खरे तर धर्माचे व संतांचेच विचार समाजापर्यंत योग्य पद्धतीने पोहोचविण्याचे काम करत होते. त्यामुळे त्यांच्या विरोधात विष पेरणारेच खऱ्या अर्थाने धर्मद्रोही व समाजद्रोही आहेत. दाभोलकर यांच्यासह ज्या चौघांची हत्या करण्यात आली त्यातील साधर्म्य पाहिले तर या हत्या वैयक्तिक शत्रुत्वातून नव्हे तर विचारधारेला असलेल्या विखारी विरोधातून झाल्याचेच दिसते. हल्लेखोर व त्यांच्या सूत्रधारांच्या दृष्टीने या मंडळीचा सर्वांत मोठा गुन्हा म्हणजे ही मंडळी विवेकवादी विचारसरणीची, विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगणारी व समाजानेही हा दृष्टिकोन बाळगावा यासाठी निर्भीडपणे काम करणारी होती, धर्माची कठोर व विज्ञानवादी चिकित्सा करून समाजात विवेकाची पेरणी करणारी होती. समाजातील अंधश्रद्धा व त्यातून होणाऱ्या शोषणाच्या विरोधात लढणारी होती. त्यांच्या या कार्याने कर्मकांडांना व झुंडशाहीला धक्के बसत होते. ज्यांची दुकाने कर्मकांड, थोतांडांवर, विखारी विचारांवर चालतात त्यांना दाभोलकरांसारखे लोक रुचणार कसे? कारण विवेकी प्रश्नांना उत्तर देण्यासाठी विवेकच लागतो. तो ही अविवेकी मंडळी आणणार कुठून? दुर्दैवाने या विवेकवादी विचारसरणीला न्याय व संरक्षण मिळवून देण्यात तपासयंत्रणा व सत्तापक्ष अपयशीच ठरला हेच या प्रकरणाच्या निकालातून स्पष्ट होते. या निकालास वरच्या न्यायालयात आव्हान देणार ही सरकार पक्षाची घोषणा विवेकवादास योग्य न्याय मिळवून दिला तरच खऱ्या अर्थाने सार्थकी ठरेल.

हर घर नल, हर घर जल योजना केवळ कागदोपत्रीच

पंढरपूर । प्रतिनिधी

सांगोला तालुक्यात पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. तालुक्यातील २७ गावे आणि २१७ वाड्या-वस्त्यांवरील ६८ हजार ८०० लोकांना ४१ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. सध्या नागरिकांची तहान शिरभावी पाणीपुरवठा योजना व टैंकरवर अवलंबून आहे, पण यामध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून तालुक्यात 'हर घर नल, हर घर जल' ही योजना केवळ कागदोपत्री राबविली असली तरी प्रत्यक्षात मात्र बहुतांशी ठिकाणी कार्यान्वित झाली नाही. तरीही पाणीपुरवठा विभाग उपकार्यकारी अभियंता यांच्याकडून मनमानी कारभार सुरू असल्याची तक्रार विविध गावांचे सरपंच करीत आहेत.

कोणत्याही प्रकारची माहिती न घेता ज्या गावांमध्ये 'हर घर नल, हर घर जल' ही योजना राबविण्यात आली आहे, त्या गावांचा टँकरद्वारे सुरू असणारा पाणीपुरवठा बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले असल्याची माहिती सरपंच देत आहेत. यामुळे संबंधित पाणीपुरवठा उपकार्यकारी अभियंता यांच्या मनमानी कारभाराला आळा बसवावा, अशी मागणी करण्यात येत आहे. उन्हाची तीव्रता अधिकच वाढली आहे. तालुक्यात ४२ ते ४३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होत आहे. परिणामी, विहीर व विंधन विहिरींनी तळ गाठला आहे. पाण्याचा एक थेंब शिल्लक राहिला नाही. नागरिकांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. परिणामी, तालुक्यात गंभीर दुष्काळ जाहीर झाला आहे. पाणीटंचाईवर उपाययोजना म्हणून शासनाने टैंकर सुरू केले आहेत. तालुक्यातील बहुताश गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाल्यामुळे सध्या नागरिकांची तहान शिरभावी पाणीपुरवठा आणि टँकरवर अवलंबून आहे. तालुक्यातील २७ गावे आणि २१७ वाड्या-वस्त्यांवरील ६८ हजार ८०० लोकांना ४१ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. 'हर घर नल, हर घर जल' या योजनेच्या पाईपलाईनला जोडणी झाली नाही. ही परिस्थिती बहुतांशी गावांमध्ये असली तरी पाणीपुरवठा विभागाच्या 'टैंकर बंद'च्या प्रस्तावावरुन सरपंच व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी तसेच ग्रामसेवक यांची धावपळ सुरू आहे. सध्या टँकरवर नागरिकांना पाणीपुरवठा सुरू असून टैंकर बंद केले तर नागरिकांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. याबाबतीत लोकप्रतिनिधी व प्रशासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणी विविध गावांच्या सरपंचांकडून करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार टँकर सुरू झाले खरे, परंतु ज्या गावांमध्ये 'हर घर नल, हर घर जल' ही योजना राबविण्यात आली आहे. त्या गावातील टँकरची सुविधा बंद करण्याच्या संदर्भात पाणीपुरवठा विभाग कार्यकारी अभियंता यांच्याकडून ग्रामपंचायत स्तरावर पत्रव्यवहार केला जात आहे, मात्र स्थानिक परिस्थिती लक्षात घेता 'हर घर नल, हर घर जल' ही योजना प्रशासकीय यंत्रणेच्या कागदोपत्रीच पूर्ण दिसून येत आहे. प्रत्यक्षात मात्र गावपातळीवर टाकण्यात आलेल्या पाईपलाईनची चाचणीदेखील करण्यात आली नाही.

मुंडे कुटुंबियांनी केले एकत्र मतदान

परळी । प्रतिनिधी

देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभुवैद्यनाथांचे दर्शन घेऊन बीड लोकसभा निवडणूकीतील भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे, कृषी मंत्री धनंजय मुंडे, खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी सोमवार दि.१३ मे रोजी नाथ्रा येथे मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांच्या मातोश्री प्रज्ञाताई मुंडे, भगिनी यशश्री मुंडे उपस्थित होत्या.

सकाळी दक्षिणमुखी गणपती, प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे पंकजा मुंडे यांनी दर्शन घेतले. त्यानंतर गोपीनाथ गड येथे जाऊन लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेतले आणि नाथ्रा येथे ग्राम दैवत पापनेश्वराचे दर्शन घेऊन सकाळी ११.०५ वा. जिल्हा परिषद शाळेतील मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. सकाळपासूनच वातावरणात उष्णता जाणवत होती तरीही मतदार मोठ्या प्रमाणात मतदान करताना दिसत होते. जागोजागी मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या.

जनता नेहमी विकासाच्या बाजूने : पंकजा मुंडे

बीड जिल्ह्यातील जनता नेहमीच विकासाच्या बाजूने राहिली आहे, जातीपातीला त्यांनी कधीच थारा दिला नाही. या निवडणूकीतही तेच दिसले. मतदानासाठी मतदारांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे. जनतेचा आशीर्वाद मला असल्याने विजय निश्चित आहे. राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनीही नाथ्रा येथे आई रुक्मिणीबाई मुंडे, पत्नी राजश्री मुंडे यांच्यासह मतदानाचा हक्क बजावला.

वक्तशीरपणा दाखविणार, मान्सून वेळेआधीच दाखल होणार

मुंबई । प्रतिनिधी

हवामान खात्याने सांगितले की, नैऋत्य मान्सून त्याच्या नियोजित वेळेपेक्षा तीन दिवस आधीच पुढे सरकत आहे. हवामान खात्यानुसार, नैऋत्य मान्सून १९ मे च्या सुमारास दक्षिण अंदमानच्या समुद्रात दाखल होणार आहे. याशिवाय तो त्याच दिवशी दक्षिण-पूर्व बंगालच्या उपसागराच्या काही भागातही प्रवेश करणार आहे. दरवर्षी २२ मे रोजी मान्सून या भागात पोहोचतो, मात्र यंदा तो तीन दिवस आधी दाखल होणार आहे. आज मुंबईसह उपनगरामध्ये झालेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. येत्या २४ तासांत मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

केरळमध्ये साधारणपणे १ जूनच्या आसपास मान्सून दाखल होत असतो. त्यानंतर तो उत्तरेकडे सरकतो. १५ जुलैदरम्यान तो संपूर्ण देशात पोहोचतो. यंदा देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल, असा अंदाज आधीच हवामान खात्याने व्यक्त केला आहे. भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार जून ते सप्टेंबर दरम्यान देशभरात मान्सूनचा पाऊस अधिक ५% च्या फरकाने सुमारे १०६% अपेक्षित आहे, जो सामान्यपेक्षा जास्त मानला जातो. सन १९७१-२०२० पर्यंतच्या दीर्घकालीन आकडेवारीच्या आधारे संपूर्ण हंगामातील दीर्घकालीन सरासरी पर्जन्यमान ८७ सेमी असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. गेल्या वर्षी मान्सूनचा दीर्घ कालावधीचा सरासरी पाऊस ९४.४% म्हणजेच सामान्यतेपेक्षा कमी होता. त्यापूर्वी २०२२ चा मान्सून एलपीएच्या १०६% वर सामान्यपेक्षा जास्त होता; २०२१ मध्ये दीर्घ कालावधीतील मान्सूनचा सरासरी पाऊस ९९% वर सामान्य आणि २०२० मध्ये पुन्हा सामान्यपेक्षा १०९% नोंदवला गेला. हवामान खात्याने म्हटले आहे की मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात एक अद्यतनित अंदाज पुन्हा जारी केला जाईल, ज्यामध्ये उत्तर-पश्चिम भारत, मध्य भारत, दक्षिण द्वीपकल्प आणि ईशान्य भारतातील मान्सूनची स्थिती आणि अंदाज याविषयी माहिती अद्यतनित केली जाईल. दक्षिण कर्नाटकच्या अंतर्गत भागांवर चक्रीवादळाचे परिवलन आहे. त्यामुळे पुढील ५ दिवसांत मध्य प्रदेश, विदर्भ, छत्तीसगड, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात गडगडाटी वादळ, विजांचा कडकडाट आणि जोरदार वा-यासह(४०-६० किमी प्रतितास) मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. १४ मे रोजी गुजरात आणि परिसरात वादळी वा-याची शक्यता असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. या काळात ताशी ३०-४० किमी वेगाने जोरदार वारे वाहू शकतात. १४ मे रोजी मध्य प्रदेशात तुरळक गारपिटीचीही शक्यता आहे. हिमालयसह पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये गडगडाटी वादळ, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा (४०-५० किमी प्रतितास) यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

पान १वरून...

मतदान केंद्रांवर शेतकऱ्यांकडून

आहे. टाकळी लोणार येथील कांदा उत्पादक शेतकरी सोमनाथ गोडसे, संदीप कुंनगर यांनी कांद्याची माळ घालून मतदानाचा हक्क बजावला. दूध दर तसेच शेतीमालाच्या बाजारभावासंदर्भात शेतकऱ्यांमध्ये रोष असून, शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय केव्हा घेणार ? असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. तिसऱ्या टप्प्यात काही दिवसांपूर्वी बारामती लोकसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पडली. या दिवशीही शेतकरी संघटेनचे पदाधिकारी असलेल्या शिवाजी नांदखिले यांनी कांद्याची माळ गळ्यात घालत आपल्या परिवारासोबत मतदान केले होते.

केंद्रात सरकार आल्यास मराठी

महाराष्ट्रात महत्वाचा ठरणार आहे. यानिमित्ताने मराठी अस्मितेला हात घालण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला आहे. काँग्रेसचे माध्यम सरचिटणीस जयराम रमेश यांनी यासंदर्भात एक्सवर पोस्ट करत सांगितले की, 'देशात इंडिया आघाडीचे सरकार आल्यास मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात येईल'. जयराम रमेश म्हणाले की, ''डॉ.मनमोहन सिंग पंतप्रधान असताना तामिळ, संस्कृत, कन्नड, तेलगू, मल्याळम आणि ओडिया या भाषांना अभिजात भारतीय भाषेचा दर्जा देण्यात आला. ११ जुलै २०१४ ला महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठीला अभिजात भारतीय भाषा घोषित करण्याची मागणी केली होती. यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षांपासून काहीही केले नाही. देशात इंडिया आघाडीचे सरकार स्थापन होताच मराठीला अभिजात भारतीय भाषा म्हणून घोषित केले जाईल, असे वचन काँग्रेस पक्ष देत आहे.'' असे ते म्हणाले.

बीड जिल्ह्यात मराठा-ओबीसीच्या

उत्साह दिसत होता. बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये १५ आदर्श मतदान केंद्र होते. यामध्ये गेवराई २, माजलगाव -२, बीड -२, आष्टी -५, केज -४ व परळी -१ हे होते. दिव्यांग, महिला, नव मतदार, तृतीयपंथी सर्वांनी उत्साहपूर्णपणे मतदान प्रक्रियेत भाग घेऊन मतदानाचा हक्क बजावला. बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये ११ दिव्यांग मतदान केंद्र होते, ५५ महिला मतदान केंद्र तर ३१६ परदानशी केंद्र होती.

विस्थापित ओबीसी मतदार जागा होणार का..?

एकेकाळी सर्व जात, धर्म, पंत विसरून रझा करांच्या विरोधात लढलेला पुरोगामी विचारांचा बीड जिल्हा आज होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत मात्र ओबीसी विरुद्ध मराठा अशी निवडणूक करुन महायुती व महाविकास आघाडी जिंकण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहे हि अत्यंत खेदाची बाब आहे!

सत्ताधारी ओबीसी समाज राजकारणात नसलेल्या भोळ्याभाबड्या ओबीसी समाजातील लोकांना या राजकीय जातीय दुहीत बळी पाडण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

कधीही राजकारण न करणारा मराठा व ओबीसीतील बांधव स्वतःच्या समाजाला आजपर्यंत काय मिळाले याचं आत्मचिंतन करायला आजही हवे तसे तयार नाहीत. जिल्ह्यात तीन नंबरची लोकसंख्या असलेल्या धनगर समाजाचा एकेकाळी बीड लोकसभेचा खासदार होता पण आजची परिस्थिती काय?

गेल्या ३५ बर्षापासुन ओबीसीतील ठराविक एका घटकाच्या छत्र छायेखाली असलेल्या ५२ सदस्य संख्या असलेल्या बीड नगर परिषदेत कोणत्याही पक्षाकडून गेल्या ३५ वर्षांपासून १ ही धनगर समाजाचा सदस्य झाला नाही का होऊन दिला जात नाही हे धनगर समाजाने अंतर्मुख होऊन तपासणे गरजेचे आहे!

काही धनगर समाजाच्या संघटनाही आहेत पण त्याही ओबीसी मधल्या प्रस्थापित असलेल्या थोरल्या आणि धाकल्या नेतृत्वाच्या फायद्यासाठीच काम करताना दिसतात.

म्हणजे एक प्रस्थापित ओबीसी बांधव तुपाशी असेल तर विस्थापित ओबीसी बांधवाला भाजी भाकरी तरी मिळाली पाहिजे हि भुमिका कधी सत्तेत बसलेला प्रस्थापित ओबीसी समाज कधी घेणार आहे का नाही?

खरचं सत्तेत वाटा नसणार्या ईतर ओबीसी बांधवांना बिलकुल कळत नसायला काही आजचा सुशिक्षित ओबीसी तरुण काही आता अनपढ राहिलेला नाही.

तो या सर्व गोष्टींचा नफ्या तोट्याचा विचार विनिमय करु लागला आहे!

का उगाच ओबीसी आहे म्हणून नेहमीच सत्तेत बसणार्या ओबीसी बांधवांना नाही रे वर्गातील ओबीसी बांधवांनी आणखी किती वर्षे उरावर घेऊन दिवस नाचायचं...? याचा विचार सत्तेत नसलेले ओबीसी मतदार कधी? करणार आहेत का नाही!

बीडच्या थोरल्या प्रस्थापित ओबीसी घरानी जो अन्याय केला तीच री पुढे ओढत परळीच्या धाकल्या प्रस्थापित ओबीसी घरानी कायम पुढे चालू ठेवला आहे

परळी नगर परिषदेत पण कधी १ च्या पुढे नगरसेवक कसा होणार नाही याची काळजी नेहमीच घेतली गेली आहे

अगदी २०१७ मध्ये परळी तालुक्यातील नागापूर जिल्हा परिषद सर्कलमध्ये धनगर समाजाच्या दिलीप आबा बीडगर यांना भाजपने उमेदवारी दिली होती व तर त्याच्या विरोधात वंजारी समाजाच्या प्रदिप मुंडेना राष्ट्रवादीने उमेदवारी दिली होती पण या निवडणुकीत बीडगर यांच्या विरोधात मुंडेचा दोन्ही पक्षातील प्रस्थापित समाज एकत्र झाला आणि बीडगर यांचा पराभव केला होता हे परळी तालुक्यातील सर्व जनतेने उघड्या डोळ्यांनी बघीतले आहे तसेच बीड तालुक्यातील पिंपळनेर जिल्हा परिषद सर्कलमध्ये धनगर समाजाचे गोरख शिंदे हे शिवसेनेचे उमेदवार होते तर राष्ट्रवादी कडुन तेली समाजाचे चंद्रकांत पेंढारी उमेदवार होते त्यावेळी शिंदेचा पराभव करण्यासाठी मोठ्या क्षीरसागरांनी सर्व राजकीय ताकत पणाला लावून शिंदेना पराभूत केले होते हे बीड तालुक्यातील जनतेने बघीतले आहे याची उमज सत्तेत नसणार्या ओबीर्सी बांधवांना कधी येणार आहे का?

का उगाचच लगीन आहे लोकांचं आणि नाचतयं येड्या भोकाचं हि भुमिका निभावून आपण आपल्या स्वतःच्या समाजाच्या पुढील पिढ्यांचं राजकीय व सामाजिक नुकसान करून घेणार आहोत..? कि स्वतःच्या जातीचं स्वतः अस्तित्व निर्माण करणार आहोत कि नाही. हे आता आपले आपणच ठरवणे काळाची आहे कारण आपण कोणालाच त्रासदायक ठरलो नाही तर आपला विचार कोणीच करणार नाही.

जिल्ह्यात चार नंबरचा समाज असलेल्या माळी समाजाची पण वेगळी परिस्थिती नाही.

मा. आ. भिमराव धोंडेंनी प्रथम एका विधानसभा उमेदवारीसाठी तत्कालीन सत्ताधारी पक्षांकडे विनंती होती पण त्यांनाही उमेदवारी नाकारली होती.

म्हणून त्यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता त्या पहिल्या निवडणुकीत तत्कालीन सक्षम विरोधी पक्ष असलेल्या शेकापने पाठींबा दिला होता म्हणून निवडून ते ती निवडणूक सहजपणे जिंकले होते.

तेव्हा कुठे आ. धोंडेंच्या रुपाने समाजाला राजकीय पटलावर जिल्ह्यात तालुका लोकप्रतिनिधी बघायला मिळाला कालांतराने ते काँग्रेस, राष्ट्रवादी व्हाया २०१४ ला भाजपमध्ये गेले व जिंकले पण नंतर २०१९ ला त्यांचा पराभव झाला होता तर परवाच जामखेडच्या सभेत महाराष्ट्र भाजपचे सर्व्हेसर्वा देवेंद्र फडवणिसांनी आष्टी पाटोदा विधानसभेचे उमेदवार म्हणून विद्यमान विधान परिषद सदस्य सुरेश धसांच्या नावाची घोषणा करून भाजपने पुन्हा १ होणार होता त्या आ. धोंडेंचेही पंख छाटले हेही विसरता कामा नये!

सत्तेतील थोरल्या व धाकल्या प्रस्थापित घरातील जे आरोग्य व शिक्षण सभापती झाले ते नंतर आमदार झालेले जिल्ह्याने बघीतले आहे

मात्र माळी समाजाचे जेष्ठ नेते कॉम्रेड पंढरीनाथ (बापू) लगड पण एक वेळा आरोग्य व शिक्षण सभापती झाले होते नंतर ते आमदार किंवा खासदार सोडाच नंतर ते जिला परिषद सदस्य पण झाले नाहीत.

याचा विचार ओबीसी समाजाने केला पाहिजे!

बीड मध्ये राष्ट्रवादीचं कायम काम करत समता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या अँड सुभाष राऊतांनाही वरीष्ठ पातळीवर प्रेशर आणल्या शिवाय स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने किंवा नेतृत्वाने साधे बीड नगर परिषदेचे तिकिट दिले नाही.

हे कधी राऊतांना भेटुन खाजगीत विचारुन बघा तुम्हाला नक्की सत्य पडताळता येईल.

याचा बदला आता होऊ घातलेल्या लोकसभेत माळी समाज घेईल कि नाही हे येणारा काळात आपल्याला ठरवेल.

वरील दोन्ही समाजाचे कधी जिल्हा नियोजन समितीवर सदस्य नसतात किंवा ईतर कमेटीवर असला तरी तो औषधापुरताच असतो!

कधी काळी नाभिक समाजाचे स्वातंत्रसैनिक कॉम्रेड काशिनाथराव जाधव बीड विधानसभेचे आमदार होते पण आज त्यांच्या समाजाचा साधा जिल्हा परिषद सदस्य किंवा नगरसेवक तूर्तास जिल्ह्यात नाही.

असे हाल आहेत बहुसंख्या असलेल्या ओबीसीचे तर कुंभार, कोष्टी, रंगारी, भावसार, लिंगायत वाणी, साळी, भविष्य सांगणारा जोशी समाज, गुरव,गोपाळ समाज, हिंदु, मुस्लिम कासार, मणियार, आतार, बागवान, नाथपंथी, गोसावी, डवरीगोसावी व ईतर सर्व छोट्या छोट्या ओबीसी आणि भटके विमुक्त यांची राजकीय व सामाजिक, आर्थिक स्थिती किती दयनीय अवस्था असेल हि कल्पना न केलेलीच बरी.

बाकी गेवराई, माजलगांव, पाटोदा, आष्टी, शिरूर कासार, वडवणी इथेही वरील ओबीसी समाजाचे राजकीय लोकप्रतिनिधी तोंडी लावण्यापुरते पण का निवडुन येत नाहीत का किंवा निवडणुकीत उभे केले किंवा राहून दिले जात नाही याचा विचार सुज्ञ विस्थापित ओबीसी मतदारांनी करणे आता मात्र काळाची गरज आहे.

भाई आकाश निर्मळ
मो.९४२२५३६९००

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि.१४ मे २०२४ ३

दिंद्रुड येथे मतदान प्रक्रिया सुरळीत; ७४.९५ टक्के मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे लोकसभा मतदान सोमवारी शांततेत पार पडले. ४८१५ व १५ एडीसी मतदारांपैकी ३६०९ मतदारांनी मतदान करत मतदानाचा हक्क बजावला. इतिहासात पहिल्यांदा लोकसभेसाठी सर्वोच्च ७४.९५ टक्के मतदान शांततेत पार पडले.

दिंद्रुड येथे सकाळी ७ वाजता मतदान प्रक्रियेस सुरुवात झाली. बूथ क्रमांक एक मध्ये ४२६ महिला व ३९५ पुरुष, बुथ क्रमांक १९१ मध्ये १९५ महिला व १९२ पुरुष, बुथ क्रमांक १९२ मध्ये २९३ महिला व ३५२ पुरुष बुथ क्रमांक १९३ मध्ये २४० महिला व २७२ पुरुष बुथ क्रमांक १९४ मध्ये २६८ महिला व ३२५ पुरुष बुथ क्रमांक १९५ मध्ये ३१० महिला व ३४० पुरुष मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ४८३० पैकी ३६०९ मतदारांनी मतदान केले. जवळपास ४० कर्मचारी व आठ पोलीस कर्मचारी यांनी मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडली.मतदान प्रक्रियेत नव मतदारांत उत्साह दिसून आला.

लिंबागणेश मतदान केंद्राचा आयजी मिश्रा,एसपी ठाकूर यांच्याकडून आढावा

लिंबागणेश । प्रतिनिधी

दि.१३ सोमवार रोजी लोकसभा निवडणुक मतदानाच्या पार्श्वभूमीवर लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील मतदान केंद्राचा पोलिस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी विशेष महानिरीक्षक परीक्षेत्र छत्रपती संभाजीनगर विरेंद्र मिश्रा, पोलिस अधीक्षक बीड नंदकुमार ठाकूर,अपर पोलीस अधीक्षक बीड सचिन पांडकर , अपर पोलीस अधिक्षक अंबेजोगाई चेतना तिडके

यांनी आढावा घेतला. यावेळी नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी चंद्रकांत गोसावी व ईतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.राखीव दलाचे तैनातीत होते.केंद्र अध्यक्ष लिंबागणेश ३४१ सुभाष भोसले ७६८ व केंद्र अध्यक्ष ३४२ क्षीरसागर जगदीश ७८१ यांनी एकुण २५१४ मतदानापैकी १५४९ असे ६० टक्के मतदान झाले. राखीव सुरक्षादलाचे १ अधिकारी १६ जवान तैनात होते.मतदान शांततेत व सुरळीत पार पडले.

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी घेण्यात आलेल्या ग्रामपंचायत निवडणुक दरम्यान प्रभाग क्रमांक २ मधील सरपंच पदाचे दावेदार असणा-या अँड.गणेश वाणी यांच्या'' शिट्टी'' चिन्ह असलेल्या बटणावर मशिनमध्ये फेव्हिस्टीक टाकल्याचा प्रकार घडुन आला आला होता. संबंधित प्रकरणी केंद्र प्रमुखांच्या फिर्यादीवरून नेकनुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे दि.२३ डिसेंबर रोजी फेरमतदान करण्यात आले होते.

मतदान केंद्रावर पाळणाघर , हिरकणी कक्ष

बीड लोकसभेच्या निवडणुकीत महिलांचा मताचा टक्का वाढावा यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी बीड दिपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात विविध उपक्रम राबविण्यात आले त्यातच महिलांचा मताचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभाग व बालकल्याण विभाग एकात्मिक बालविकास सेवा योजना विभागाने मतदान केंद्रावर पाळणाघरे व हिरकणी कक्ष करण्याचे नियोजन केले होते.त्याअनुषंगाने अंगणवाडी सेविका बबिता निर्मळ, आबदार यांनी मतदान केंद्रावर पाळणाघर व हिरकणी कक्ष सजावट करून सज्ज केलेला असुन लहान बालके असणा-या महिलांना मतदान करून येईपर्यंत आपल्या बालकांना या पाळणाघरात ठेवता येणार आहे त्यामुळे महिला उत्स्फूर्तपणे मतदानास येतील व मतदानाचा टक्का वाढणार आहे.

पंतप्रधान मोदींच्या तोंडी उठसूट मुघल, मुस्लीम व मंगळसूत्राचीच चर्चा-खर्गे

नवी दिल्ली । वृत्तसेवा

काँग्रेस पक्ष देशासाठी लढला, अनेकजण फासावर गेले, पण महात्मा गांधी यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून लढले व देशाला स्वातंत्र मिळवून दिले, भारतीय जनता पक्षाने देशासाठी काय केले असा प्रश्न विचारत निवडणुकीत विकासाच्या कामावर मते मागितली पाहिजेत पण पंतप्रधान नरेंद्र मोदी दररोज हिंदू-मुस्लीम समाजात तेढ निर्माण करणारी विधाने करत आहेत. उठसूट मुघल, मुस्लीम व मंगळसूत्र हीच भाषा वापरतात आणि अब की बार ४०० पार चा नारा देतात. देशातील चित्र बदलले आहे अब की ४०० पार नव्हे तर भाजपाला देशभरातून ४० जागाही मिळणे अवघड आहे, असा हल्लाबोल काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी केला आहे.

एका कार्यक्रमात खर्गे बोलत होते. भाजपा व मोदी सरकारचा समाचार घेत मल्लिकार्जून खर्गे पुढे म्हणाले की, भाजपा, आरएसएस व नरेंद्र मोदी यांना ४०० जागांचे बहुमत मिळवून संविधान संपवायचे आहे. २०१५ मध्येच संविधान बदलण्याची जाहीर भाषा करण्यात आली होती. सरसंघचालक मोहन भागवत यांनीही आरक्षणाची समिक्षा करण्याचे जाहीरपणे सांगितले आहे, आताही भाजपा खासदार संविधान बदलणार असल्याचे बोलत आहेत. संविधान बदलले तर दलित, मागास, गोरगरिब लोकांचे आरक्षण व मुलभूत हक्क हिरावून घेतल जाणार आहेत. संविधानाचे रक्षण केले नाही तर जनतेचे नुकसान होणार आहे. भाजपाचा हा डाव कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होऊ द्यायचा नसेल तर भाजपाचा पराभव करा, असे आवाहनही यावेळी केले. मल्लिकार्जून खर्गे पुढे बोलताना म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी दररोज खोटे बोलतात, खोटे बोलण्याची त्यांना सवय झाली आहे. परदेशातील काळा पैसा आणून प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख देणार, दरवर्षी २ कोटी नोकरी देणार, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार, असे सांगितले होते, पण यातील एकही आश्वासन मोदींनी पूर्ण केले नाही. आता ते मोदी गॅरंटी म्हणत आहेत पण जनता आता नरेंद्र मोदींच्या अशा भूलथापांना बळी पडणार नाही. मोदी सरकारने विरोधी पक्षांच्या लोकांना नाहक त्रास दिला. दडपशाही करून ८०० लोकांना ईडी, सीबीआयचा गैरवापर करून जेलमध्ये टाकले. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, अजित पवार व एकनाथ शिंदे यांनीही कारवाईच्या भितीपोटी नरेंद्र मोदी समोर लोटांगण घातले. मोदी सरकार निवडून आलेले सरकार पाडण्यासाठीही ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स या तीन चाव्यांचा वापर करते असा आरोपही केला.

नाथापुर येथे ईव्हीएमच्या संथ गतीमुळे संध्याकाळी ६ नंतरही मतदान सुरूच

नाथापूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नाथापूर येथे होत असलेल्या लोकसभा निवडणूक २०२४ चे मतदानावेळी मतदारांना अडचणीं आल्या.बूथ क्र.२ मधील मशीन संथ गतीने चालत आल्यामुळे दुपारपासून या बूथावर मतदारांची गर्दी वाढत गेली.संध्याकाळी ६ वाजेपर्यंत किमान दोनशे मतदारांचे मतदान करणे बाकी असल्याने त्यांना बूथ प्रमुखकडून सिरीयल नंबर च्या चिठ्या देण्यात आल्या.त्यानंतर पोलीस बंदोबस्तात मतदान प्रक्रिया सुरळीत सुरु झाली.संपूर्ण मतदान प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी संध्याकाळी किमान आठ वाजतील अशी प्रतिक्रिया बूथ प्रमुखांनी बोलताना दिली.

विधानसभेच्या प्रत्येक मतदारसंघामध्ये असणार महिला, दिव्यांग आणि युवा संचलित मतदान केंद्र

मुंबई उपनगर । प्रतिनिधी

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात २० मे २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान होणार आहे. या मतदानासाठी जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघातील २६ विधानसभा मतदारसंघात महिला, युवक आणि दिव्यांग कर्मचारी संचलित प्रत्येकी एक मतदान केंद्र असणार आहे. मतदान केंद्र उभारणीची सर्व तयारी आणि नियोजन पूर्ण करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा निवडणूक यंत्रणेमार्फत देण्यात आली आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यात विधानसभेचे एकूण २६ मतदारसंघ आहेत. २६- मुंबई उत्तर, २७- मुंबई उत्तर पश्चिम, २८- मुंबई उत्तर पूर्व, २९- मुंबई उत्तर मध्य या लोकसभा मतदारसंघात समाविष्ट आहेत, तर चेंबूर आणि अणुशक्तीनगर या दोन मतदारसंघांचा समावेश मुंबई शहर जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या लोकसभा मतदारसंघात आहे. या चारही मतदारसंघात सोमवार २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी पूर्ण केली आहे.मुंबई उपनगर जिल्ह्यात ७,३८४ एवढ्या मतदान केंद्रांचा समावेश आहे. या मतदान केंद्रांवर मतदारांना मूलभूत सोयीसुविधा पुरविण्यात येणार आहेत. तसेच विधानसभेच्या प्रत्येक मतदारसंघात प्रत्येकी एका मतदान केंद्रांचे संचलन महिला, तरुण आणि दिव्यांग अधिकारी व कर्मचारी करणार असून त्याचे संपूर्ण नियोजन करण्यात आले आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात महिला अधिकारी व कर्मचारी संचलित एकूण २६, तरुण अधिकारी व कर्मचारी संचलित २६, तर दिव्यांग अधिकारी व कर्मचारी (सक्षम केंद्र) संचलित एकूण २६ मतदान केंद्र असतील, असेही जिल्हा प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे.

शंभर वर्षाच्या आज्जीने बजावला मतदानाचा अधिकार

किल्ले धारूर । प्रतिनिधी

लोकशाहीच्या देशात निवडणूका हा उत्सव आसतो.बीड जिल्हयात ही निवडणूकाचा उत्सव आनंदात साजरा होत आहे.या साठी प्रशासनाने ही चांगली तयारी केल्याचे दिसून आले.लहान मुलांसाठी पाळणार ते वयोवृध्द व विशेष गरजवंत अपंग मतदारांसाठी घरपोच मतदान केंद्र ही सुविधा देण्यात आली होती.

गांजपूर येथे १०० वर्षाच्या गवळणबाई नरहरी डापकर(मुंडे)यांनी आपला पवित्र मतदानाचा अधिकार बजावला.या वेळी मतदान केंद्रावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रा.ईश्वर मुंडे,प्रतिष्ठीत शेतकरी केशव नरहरी डापकर तसेच इतर मतदार उपस्थीत होते.

मतदानाचा टक्का वाढवा या उद्देशाने माजलगाव तालुक्यातील बुथ क्रमांक २७ ग्रामपंचायत सोमठाणा येथे मतदारांच्या लहान बालकांसाठी पाळणाघराची सोय करण्यात आली होती. यावेळी संतोष लोकरे सर, कमल गोरे,वर्षा गोरे आदी कर्मचारी उपस्थित होते.

रक्तदान शिबिरासारख्या समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करणे ही काळाची गरज -डॉ.चौसाळकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील पेशवा प्रतिष्ठान तर्फे परशुराम जन्मोत्सव निमित्त आयोजित केलेले रक्तदान शिबिर हे काळाची गरज असल्याचे मत डॉ गोपाळ चौसाळकर यांनी व्यक्त केले. ते रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी डॉ सुधीर धर्मपात्रे, डॉ शशांक पाठक, संतोष कचरे, राहुल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात ३९ जणांनी रक्तदान केले. पेशवा प्रतिष्ठान तर्फे २००९ पासून भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत असून आतापर्यंत ९०० पेक्षा जास्त रक्तदान झाले असल्याची माहिती डॉ महेश अकोलकर यांनी दिली. या शिबिरात डॉ महेश अकोलकर ,शैलेश दीक्षित,ममता दीक्षित,अविनाश लहुरीकर,अथर्व जड, राहुल कुलकर्णी,रेवती कुलकर्णी मुक्ता राहुल कुलकर्णी, पार्थ कुलकर्णी,प्रमोद नांदगावकर,डॉ संकेत तोरंबेकर, केदार वारकरी,विशाल जहागीरदार,केदार दामोशन,सूरज सांगवीकर, विनय बाभूळगावकर,दीपक कुलकर्णी

परशुराम जन्मोत्सव निमित्त पेशवा प्रतिष्ठान तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन, ३९ जणांचे रक्तदान

राडिकर , सर्वेश सेलूकर,डॉ मिलिंद कळंबकर ,आश्लेषा कलंबकर,नरेंद्र बर्दापूरकर,सारंग भातलवंडे,शंकर निकम,राघव कुलकर्णी,डॉ प्रिया मुळे,कल्पना लातूरकर,मधुरा लातूरकर,शिरीष हिरळकर,आदित्य राखे, गणेश देशमुख, वामन खोत,विनोद खंडागळे, अविनाश आकाते,सुजित दीक्षित, संजय कुलकर्णी, मनीषा कुलकर्णी,कल्याणी कुलकर्णी, अनघा लहूरीकर , रोहिणी पाठक यांनी रक्तदान केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी पेशवा प्रतिष्ठान चे राहुल कुलकर्णी, विलोक बाभुळगावकर, वैभव देशपांडे, राघव कुलकर्णी, प्रतीक्षा जोशी, ज्योती कुलकर्णी,तन्मय जोशी, आयुष लहुरीकर यांनी पुढाकार घेतला. शिबिरासाठी रक्तपेढीत कार्यरत डॉ रिया बागडे, शशिकांत पारखी, आनंद सितप, जगदीश रामदासी, वाल्मीक कांबळे,शामली गोबरे, मुस्कान सय्यद यांनी सहकार्य केले.

साठवलेल्या दूषित पाण्यामुळे अतिसाराच्या रुग्णसंखेत मोठी वाढ

कोळगाव । प्रतिनिधी

गतवर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे यंदा पाण्यासाठी ग्रामीण भागात दाही दिशा भटकंती करावे लागत आहे सध्या मी महिना सुरू असून दिवसेंदिवस तापमानात प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे अशा परिस्थितीत गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात प्रशासनाकडून केले जाणारे पाणीपुरवठा देखील दहा ते बारा दिवसावर ठेपला आहे त्यामळे ळे गावकऱ्यांकडून साठवलेल्या पाण्याचा मोठ्या प्रमाणावर केला जाणारा वापर व उष्णतेची प्रचंड तीव्रता या बाबींमुळे ग्रामीण भागात सध्या अतिसाराच्या रुग्णांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे गेवराई तालुक्यात शासकीय आणि खाजगी दवाखान्यात आरोग्य केंद्रात दररोज तब्बल दहा ते पंधरा रुग्णांवर उपचार केले जात आहेत यंदा सुरतीपासूनच उन्हाळ्याची तीव्रता जास्त आहे गत वर्षात अल्प पाऊस असल्यामुळे जेमतेम भागात आहेत आहे जात जात या जमिनीत पाण्याची पातळी झपाट्याने खोल गेली आहे त्यातच मे महिन्यात तापमानात प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे गेवराई तालुका नगर परिषदे कडून ग्रामीण भागात करण्यात येणाऱ्या टँकरद्वारे पाणीपुरवठ्यामध्ये दिवसेंदिवस कालावधी वाढविण्यात येत आहे आता तर चक्क बारा ते पंधरा दिवसानंतर एका गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे पाण्याच्या उपलब्धतेनुसार अत्यंत अल्प पाणी येत असल्याम ग्रामीण भागात पाणीपुरवठा केला जात आहे काही पाण्याची प्रचंड हाल सुरू शिवारभर गावकऱ्यांना पाण्यासाठी भटकंती कराबी लागत पाणीपुरवठा उशिरा केला असल्यामुळे अर्थातच ग्रामीण भागातील नागरिकाकडून मोठ्या प्रमाणावर पाण्याची साठवण केली आहे अशा परिस्थितीत साठवलेली पाणी दूषित होत असून पाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव देखील मोठ्या प्रमाणावर वाढत आहे तर या पाण्याचा वापरामुळे अतिसार गॅस्ट्रो असे आजार रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळून आले आहेत जुलाब उलट्या त्यामुळे रुग्णांना त्रास होत आहे लहान मुलांची देखील रुग्ण पडत असून मादळमोही सह आरोग्य केंद्र खाजगी रुग्णालयात बीड अशा ठिकाणी दररोज दहा ते पंधरा रुग्णांवर उपचार केला जात आहे काही रुग्णांना उपचारासाठी शहरांमध्ये भरती करावी लागत आहे तर अनेक रुग्ण हे खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत गेवराई नगर परिषदेतील निष्क्रिय कारभारामुळे वेळेवर गावाला टैंकर पोहोचत नसल्याने ज्या भागात पाणीटंचाई आहे अशा ठिकाणी चार टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती असली तरी आणखी दोन ठिकाणची प्रस्ताव आल्याचे सांगण्यात आले आहे दररोज दहा ते पंधरा रुग्ण ग्रामीण रुग्णालयात उपचार साठी येतात तर अनेक रुग्ण माधुरीच्या आरोग्य केंद्र उपकेंद्र आणि खाजगी रुग्णालयात देखील उपचारासाठी जात आहेत पाणी उकळून गाळून प्यावे तसेच काही त्रास वाटल्यास तातडीने उपच घ्यावी तशी ग्रामीण भागातील आरोग केंद्राची वैद्यकीय अधिकारी वेळोवेळ सूचना देत असले तरी साठवलेल्य पाण्यामुळे ग्रामीण भागात रोगराण नागरिकांना झपाटले आहे पाणी प्रश्?बाबत दखल घेणे आवश्यक असल्?तरी गेवराई नगर परिषदे कडून ग्रामीण भागात वेळेवर पाणीपुरवठा टँकरद्वा होत नसल्याची तक्रारी गावकऱ्यांन केले आहे विशेष म्हणजे ग्रामीण भागात सध्या भीषण पाणीटंचाईल्? नागरिकांना तोंड द्यावे लागत आ सध्या लोकसभेची निवडणूक सुरू असून लोकप्रतिनिधी आमदा नेते मंडळी आणि उमेदवार सध्य जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष न देता केवट मला मतदान करा अशा आरोळ्य ठोकत असून गावात पाण्याचे हं कल्लोली बॅरल ठेवताना हे नेते मंडळ याबाबत कसलाच उच्चार करी असल्याचे यामुळे नागरिकांमध्?त्यांच्याविरुद्ध चिड निर्माण हो असल्याचे चित्र समोर दिसत आहे

जवळा येथे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक शांततेत मतदान

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथे ३९-बीड लोकसभा निवडणूक मतदान शांततेत पार पडले मतदान केंद्र क्रमांक २३९ फकीर जवळा एकूण १२३१ मतदान असुन त्यातील ८५८ मतदान झाले त्यात ४७९ पुरुष व ३७९ महिला नी मतदानाचा हक्क बजावला जवळा येथे एकुण ६९.६९ टक्के मतदान झाले. यात दोन अपंगानी मतदाना चा हक्क बजावला मतदान केले.

खरीप हंगामासाठी पुणे जिल्ह्यात तब्बल ३२६ कोटी रूपयांचे कर्ज वाटप!

पुणे । प्रतिनिधी

खरीप हंगामासाठी कर्ज वाटप म्हणून पुणे जिल्ह्यातील ३० हजार १९४ शेतकऱ्यांना आतापर्यंत ३२६ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

पुणे जिल्ह्यात खरीप पीक कर्जाचे वाटप जोरात सुरू असून, एप्रिल अखेरीपर्यंत उद्दिष्टाच्या २५% वाटप झाले आहे. या खरीप हंगामात जिल्ह्यातील १ लाख ३६ हजार ७७५ शेतकरी खातेदारांना १३०० कोटी रूपयांचे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक जिल्ह्यात पीक कर्ज वाटपात आघाडीवर असून, एप्रिल अखेर त्यांच्या उद्दिष्टाच्या ४०% कर्ज वाटप केले. विदर्भ कोकण ग्रामीण बँकेने देखील आपल्या उद्दिष्टाच्या २८% रक्कम वितरित करून चांगली कामगिरी केली आहे. तथापि, राष्ट्रीयीकृत आणि खासगी क्षेत्रातील बँका मागे पडल्या आहेत, त्यांनी त्यांच्या संबंधित लक्ष्याच्या अनुक्रमे केवळ

५% आणि ७% वितरित केले आहेत. पीक कर्ज वाटप जलद गतीने व्हावे, यासाठी बँकांना कर्ज अर्जाची प्रक्रिया सोपी करून कर्ज मंजूरीसाठी लागणारा वेळ कमी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शेतकर्यांपर्यंत पोहोचण्यासाठी ग्रामीण भागात विशेष शिबिरे घेण्यासही बँकांना सांगण्यात आले आहे. शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीटकनाशके आणि लागवडीसाठी आवश्यक असलेल्या इतर निविष्ठा खरेदी करण्यासाठी बँका पीक कर्जाच्या स्वरुपात आवश्यक निधी देतात. पीक कर्जाचे वेळेवर वितरण चांगले पीक आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आहे. एकंदरीत पुणे जिल्ह्यात पीक कर्ज वाटपाची प्रक्रिया चांगली सुरू आहे. तथापि, सर्व पात्र शेतकर्यांना वेळेवर कर्ज मिळावे यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज आहे. महाराष्ट्रात खरीप हंगाम सामान्यत: जून ते सप्टेंबरापर्यंत चालतो. पुणे जिल्ह्यातील मुख्य खरीप पिकांमध्ये भात, ज्वारी, बाजरी, तूर आणि उडीद यांचा समावेश होतो. शासनाने २०२४-२५ च्या खरीप हंगामात जिल्ह्यात ११. २५ लाख मेट्रिक टन धान्य उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवले आहे.

बँकनिहाय कर्ज वाटप

सार्वजनिक क्षेत्रातील बँका : २६४७ शेतकर्यांना २७ कोटी ५१ लाख रुपये

खाजगी क्षेत्रातील बँका: २५७ शेतकर्यांना ३ कोटी १४ लाख रुपये

विदर्भ कोकण ग्रामीण बँक : ३५२२ शेतकर्यांना ४२ कोटी ९२ लाख रुपये

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक : २३ हजार ७६८ शेतकर्यांना २५२ कोटी ४७ लाख रुपये.

२०२४-२५ या वर्षात भारतातून होणार जवळपास १८ दशलक्ष टन तांदूळ निर्यात!

नवी दिल्ली । वृत्तसेवा

युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चर च्या अलीकडच्या अंदाजानुसार सध्या भारतातून तांदूळ निर्यातीवर निर्बंध असूनही भारत जागतिक तांदूळ बाजारपेठेतील आघाडीचा खेळाडू होऊ शकतो. २०२४-२५ मध्ये जवळपास १८ दशलक्ष टन तांदूळ निर्यात होईल, जी मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे २ दशलक्ष टन अधिक आहे.

भारताची तांदूळ निर्यात हा जागतिक व्यापाराचा एक मोठा भाग आहे, परंतु २०२१-२२ मध्ये निर्यात केलेल्या विक्रमी २२ दशलक्ष टनांपेक्षा यावर्षी होणारी निर्यात खूपच कमी असेल, असेही ने म्हटले आहे. तांदळाचा वाढता पुरवठा, व्यापार, उपभोग आणि संपुष्टात येणारा साठा याचा जागतिक तांदूळ बाजार २०२४-२५ यावर प्रभाव राहणार आहे. तांदळाचे दरवर्षी ५२७.६ दशलक्ष टन विक्रमी उत्पादन होते जे सुरुवातीला तांदळाच्या कमी साठ्याची भरपाई करतो. प्रामुख्याने भारत, चीन, बांगलादेश आणि इंडोनेशिया या देशात होणाऱ्या तांदळाच्या भरघोस उत्पादनावर तांदळाची जागतिक बाजारपेठ ठरते. भारत, फिलीपिन्स, इंडोनेशिया आणि बांग्लादेश यासारख्या देशात तांदळाचा जास्त होणारा वापर, चीनमध्ये उत्पादनात होणारी घट, यामुळे तांदळाचा अंदाजे ५२६.४ दशलक्ष टन इतका जागतिक विक्रमी वापर होणार असल्याचा अंदाज आहे. तांदूळ उत्पादक देशांमध्ये उत्पादन आणि उपभोगातील नफ्याचा अंदाज असल्याने, जागतिक व्यापार ५३.८ दशलक्ष टन इतकाच वाढण्याचा अंदाज आहे, परंतु २०२२ मध्ये भारताने प्रथम तांदूळ निर्यातीवर निर्बंध लादण्यापूर्वी तांदूळ निर्यात व्यापाराच्या पातळीपेक्षा कमी आहे,'' असे म्हटले आहे.

भारतीय केशरला सोन्याचा भाव!

१ किलोसाठी मोजावे लागताहेत ४.९५ लाख रुपये

पुणे । प्रतिनिधी

राज्यासह देशभरातील केशर उत्पादकांना सुगीचे दिवस आले आहेत. गेल्या काही काळापासून अनेक जण राज्यात बंदिस्त वातावरणात केशर लागवड करताना आढळून आले आहेत. विशेष म्हणजे त्यांना गुणवत्तापूर्ण केसर उत्पादन मिळवण्यात यश देखील आले आहे. अशातच आता भारतीय केशरच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली आहे. सध्या १ किलो भारतीय केशरसाठी तब्बल ४.९५ लाख रुपये मोजावे लागत आहेत. हे दर गेल्या काही महिन्यातच २० ते २७ टक्क्यांनी वाढले आहेत. त्यामुळे नव्याने केशर उत्पादन मिळवत असलेल्या उत्पादकांसाठी ही आनंदाची बातमी मानली जात आहे.

पश्चिम आशियातील भू-राजकीय तणावामुळे इराणमधून केशरच्या पुरवठ्यात मोठी घट झाली आहे. इराण हा जगातील सर्वात मोठे केशर उत्पादक देश आहे मात्र तेथील उत्पादनात घट झाल्याने जागतिक बाजारपेठेत केशरची टंचाई निर्माण झाली आहे. भारतासह अनेक देश इराण मधूनच केशर आयात करतात.

भारतातील उत्पादनातही घट

इराणमधील पुरवठ्यात घट झाली मात्र भारतातील केशर उत्पादनातही यंदा घट झाली आहे. जम्मू-काश्मीर हे भारतातील सर्वात मोठे केशर उत्पादक राज्य आहे. मात्र राज्यात हवामानातील बदलांमुळे केशर उत्पादनात घट झाली आहे. भारतीय केशरला जगभरात मागणी आहे. सध्या सण आणि उत्सव जवळ येत आहेत. आणि या काळात केशरची खरेदी वाढते. त्यामुळे मागणी वाढल्याने आणि पुरवठा कमी झाल्याने केशरच्या किंमतीत वाढ झाली आहे.

त्यामुळे पुरवठा कमी झाल्याने, भारतातील केशरला मागणी वाढली असून, परिणामी केसरच्या किंमतीत देखील मोठी वाढ झाली आहे.

भारतात अनेक ठिकाणी केशरचे उत्पादन होते. मात्र, काश्मीर केशराला सर्वाधिक मागणी आहे. काश्मीर केशरचा दर्जा उत्तम मानला जातो आणि त्याची चव आणि सुगंधही अप्रतिम असतो. त्यामुळे काश्मीर केशरची किंमत इतर केशरच्या तुलनेत जास्त असते. भारत यूएई, यूएसए, ऑस्ट्रेलिया, नेपाळ आणि कॅनडा या देशांना केशरचा पुरवठा करतो. केशरचा वापर अनेक पदार्थांमध्ये केला जातो. मिठाई, पदार्थ, चहा आणि कॉफीमध्ये केशर टाकून त्याची चव आणि सुगंध वाढवला जातो. तसेच केशर औषधी गुणधर्मांसाठीही प्रसिद्ध आहे.

ऊस, केळी पिकाला फळाचा दर्जा मिळवून देणार - मंत्री गुलाबराव पाटील!

जळगाव पट्टा हा केळी आणि उसाचा पट्टा म्हणून ओळखला जातो. या पट्ट्यातील ऊस आणि केळीला फळाचा दर्जा देण्यात यावा, अशी आपली जुनी मागणी आहे. केळी आणि उसाला फळाचा दर्जा केंद्र सरकारने द्यावा. म्हणून आपण प्रयत्न करणार असल्याचे राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी म्हटले आहे.

माजी खासदार कै.हरिभाऊ जावळे यांच्या केळी महामंडळ स्थापनेचे स्वप्न पूर्ण करताना राज्य सरकारने केळी महामंडळ स्थापन केले होते. महामंडळाला १०० कोटींची तरतूद केल्याचे म्हटले होते. राज्याने फळबाग लावगड योजनेतंर्गत केळीला फळांचा दर्जा दिला होता. याला अद्यापही केंद्र सरकारची मान्यता मिळालेली नाही. त्यासाठी आमचे सरकार येताच खासदार महामंडळासाठी प्रस्ताव केंद्राला सादर करतील, असेही त्यांनी सांगितले आहे. खानदेशातील उत्तर महाराष्ट्र महामंडळाच्या मान्यतेसाठी आमच्या खासदारांनी केंद्रात भाजपचे सरकार येताच मागणी करावी. ही विनंती आमच्या खासदारांना करणार आहे. जळगावसह जिल्ह्यात अनेक वर्षांपासून पाण्याच्या प्रश्न गंभीर आहे. यामुळे केंद्र सरकारने खानदेशाच्या कृषी सिंचनाचा अनुशेष भरून काढायला हवा. कृषी सिंचनासाठी असणाऱ्या केंद्राच्या योजनांमध्ये जळगावसाठी देखील योजना असायला हव्यात. जर अशा योजना अंमलात आल्या असत्या तर आता दुष्काळाच्या स्थितीत पाण्याचा प्रश्न मार्गी लागला असता. असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे.

खानदेशासाठी महामंडळ असावे. राज्यासह देशात जशी इतर महामंडळे आहेत. तसेच खानदेशासाठी उत्तर महाराष्ट्र महामंडळ असावे, अशी आपली जूनी मागणी आहे. यावर अद्यापही केंद्र सरकारने कोणताच निर्णय घेतलेला नाही. खानदेशातून ५६ आमदार निवडणून येतात. यामुळे खानदेशातील उत्तर महाराष्ट्र महामंडळाच्या मान्यतेसाठी येथील खासदारांनी केंद्रात भाजपचे सरकार येताच मागणी करावी. ही विनंती आपल्या खानदेशातील खासदारांना करणार असल्याचेही त्यांनी शेवटी म्हटले आहे.

उसावर होणाऱ्या 'ब्लॅक बग' रोगाचे एकात्मिक नियंत्रण

ऊस पिकात 'ब्लॅक बग' म्हणजेच काळ्या किडीचा प्रादुर्भाव झपाट्याने होत आहे. या किडीचा प्रादुर्भाव साधारणतः एप्रिल ते जून या महिन्यात होतो. ऊस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी त्यांच्या ऊस पिकाची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जाणून घेऊ या किडीचे एकात्मिक नियंत्रण उपाय.

सध्या उसामध्ये या किडीचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता असते, ज्याला काळे बग असेही म्हणतात. यामुळे उसाचे पीक उद्ध्वस्त होऊ शकते. काळे बग या उसामध्ये आढळणाऱ्या किडीचे वेळीच नियंत्रण न केल्यास संपूर्ण पिकाचा नाश होऊ शकतो.

ब्लॅक बग किडीमुळे होणारे नुकसान :

काळे किडे ऊस पिकाची पाने आणि देठातील रस शोषून थेट नुकसान करतात. या प्रादुर्भावामुळे पाने कोमेजतात, झाडाची वाढ खुंटते आणि उसाचे उत्पादन कमी होते. शिवाय, काळे बग उसाच्या पिवळ्या पानांचे विषाणू आणि इतर रोगजनकांचा प्रसार करू शकतात, ज्यामुळे पिकाचे होणारे नुकसान वाढते.

एकात्मिक नियंत्रण उपाय :

उसाची शेंगा, तृणधान्ये किंवा भाजीपाला यासारख्या पिकासोबत पीक फेरपालट करावी यामुळे या किडीचा प्रादुर्भावास प्रतिबंध होतो. उसाची वेळेवर लागवड, प्रतिरोधक वाणांसह आंतरपीक घेणे, नियमितपणे तण काढणे आणि योग्य माती व्यवस्थापन यासारख्या उपायांमुळे सुद्धा उसामध्ये काळ्या किडींचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यास मदत होऊ शकते. उसावरील ब्लॅक बगचा प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमितपणे पिकांचे निरीक्षण करून सुरुवातीच्या काळातच काळ्या बगचा प्रादुर्भाव शोधणे महत्त्वाचे आहे. यामुळे वेळेवर वेळेवर नियंत्रण उपाय करून होणारे जास्तीचे नुकसान टाळता येते. शेतातील ब्लॅक बगच्या संख्येवर लक्ष ठेवण्यासाठी पिवळे चिकट सापळे किंवा स्वीप नेट वापरावे. या किडीच्या प्रतिबंधासाठी व्हर्टिसिलियम लॅकनी १.१५ टक्के डब्ल्यू. पी. ते ४००-५०० लिटर पाण्यात २.५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणात मिसळून आवश्यकतेनुसार १५ दिवसांच्या अंतराने संध्याकाळी फवारणी करावी. भुंगे, ढेकूण आणि कोळी यासारखे कीटक ब्लॅक बगला खाऊन त्यांचे नियंत्रण करण्यास मदत करतात.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१७९६: इंग्लंडच्या ग्लूस्टर परगण्यातील बर्कले येथील जेम्स फिलीप या आठ वर्षाच्या मुलाला जगातील पहिली देवीची लस टोचण्यात आली.
१९४०: दुसरे महायुद्ध - हॉलंडने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४८: इजराईल देशाला स्वातंत्र्य राष्ट्र घोषित करून त्याठिकाणी एक अस्थायी सरकारची स्थापना करण्यात आली होती.
१९५५: सोविएत रशिया, अल्बानिया, बल्गेरिया, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, पोलंड, रुमानिया आणि पूर्व जर्मनी या कम्युनिस्ट राष्ट्रांचा वीस वर्षांचा परस्पर संरक्षणासाठीचा वॉर्सा करार पोलंडमधील वॉर्सा येथे झाला.
१९६०: एअर इंडिया ची मुंबई - न्यूयॉर्क विमानसेवा सुरू झाली.
१९६३: कुवेतचा संयुक्त राष्ट्रसंघात प्रवेश.
१९६५: चीनने सकाळी साडे सात वाजता (भारतीय वेळ) आपल्या दुसर्या अणुबॉम्बचा यशस्वी स्फोट केला.
१९८१: अमेरिकन अंतराळ संस्था नासाने अवकाशातील लोकांकरिता वाहतुकीसाठी अंतराळ वाहन एस-१९२ ची निर्मिती केली.
१९८२: ऑल इंडिया रेडिओचे आकाशवाणी असे नामकरण करण्यात आले.
१९९७: देशातील आणि महाराष्ट्रातील पहिल्या महिला सहकारी साखर कारखान्याची साखर आयुक्त कार्यालयात सहकार कायदा कलम चारखाली नोंदणी झाली. इंदिरा गांधी भारतीय महिला विकास सहकारी साखर कारखाना असे त्याचे नाव आहे.
२००१: भारत आणि मलेशिया या दोन राष्ट्रांमध्ये सात करार हस्ताक्षरीत करण्यात आले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३१६: चार्ल्स चौथा, पवित्र रोमन सम्राट
१६५७: धर्मवीर संभाजीराजे यांचा जन्म पुरंदर किल्ल्यावर (मृत्यू: ११ मार्च १६८९)
१६६५: मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या पहिल्या पत्नी राणी सईबाई यांचे थोरले पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्मदिन.
१८८३: भारतीय वकील दीवान बहादूर सर अल्लादी कृष्णास्वामी अय्यर यांचा जन्मदिन.
१८९२: पश्चिम बंगाल मधील भारतीय स्वातंत्र्य सेनानी अरुण चंद्र गुहा यांचा जन्मदिन.
१९०७: फील्ड मार्शल आणि पाकिस्तानचे दुसरे राष्ट्राध्यक्ष आयुब खान यांचा जन्म. (मृत्यू: १९ एप्रिल १९७४)
१९०९: विनोदसम्राट, कलागौरव पुरस्कार, चित्रभूषण पुरस्कार व बालगंधर्व पुरस्काराने सन्मानित वसंत शिंदे यांचा जन्म. (मृत्यू: ४ जुलै १९९९)
१९१२: साली ख्यातनाम आंतरराष्ट्रीय पुरातत्वशास्त्रज्ञ, डेक्कन कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट आणि रिसर्च इन्स्टिट्यूट, डीम्ड युनिव्हर्सिटी, पुणे, चे माजी कुलगुरू तसचं, गांधीनगर येथील मेरीटाईम हेरिटेज कॉम्प्लेक्सचे महासंचालक भारतीय विनोदी सम्राट, कलागौरव पुरस्कार, चित्रभूषण पुरस्कार व बालगंधर्व पुरस्कार सन्मानित वसंत शिंदे यांचा जन्मदिन.
१९२३: मृणाल सेन - भारतीय चित्रपट दिग्दर्शक.
१९२६: आनंदग्रामच्या संस्थापिका व थोर समाजसेविका डॉ. इंदुताई पटवर्धन यांचा जन्म. (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९९९)
१९३६: वहीदा रेहमान - हिंदीचित्रपट अभिनेत्री.
१९८१: भारतीय संगणक शास्त्रज्ञ प्रणव मिस्त्री यांचा जन्म.
१९९०: फेसबुकचे सहसंस्थापक मार्क झकरबर्ग यांचा जन्म.
१९९८: रसना च्या जाहिरातीतील बालकलाकार तरुणी सचदेव यांचा जन्म. (मृत्यू: १४ मे २०१२).

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५७४: गुरू अमरदास - तिसरे शीख गुरु.
१६४३: फ्रान्सचा राजा लुई (तेरावा) यांचे निधन.
१९२३: नारायण गणेश चंदावरकर - अखिल भारतीय काँग्रेसच्या मूळ संस्थापकांपैकी एक, कायदेपंडित व समाजसुधारक. (जन्म: २ डिसेंबर १८५५ होन्नावर, उत्तर कन्नडा, कर्नाटक)
१९४३ : भारतीय स्वातंत्र्य क्रांतिकारक व राजकारणी अल्लाह बक्स मुहम्मद उमर सोमरी यांचे निधन.
१९६३ : भारतीय जनसंघाचे अध्यक्ष व प्रख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. रघुवीर यांचे अपघाती निधन (जन्म: ३० डिसेंबर१९०२)
१९७८: नाटककार व लेखक जगदीश चंद्र माथूर यांचे निधन. (जन्म: १६ जुलै १९१७)
१९९८ : हॉलिवूड मधील अभिनेते व गायक फ्रँक सिनात्रा यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९१५)
२०१०: भारताच्या साहित्य क्षेत्रांतील सर्वोच्च साहित्य पुरस्कार ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय महाराष्ट्रीयन मराठी लेखक विंदा करंदीकर यांचे निधन.
२०१३ : भारतीय लेखक असगर अली इंजिनिअर यांचे निधन. (जन्म: १० मार्च १९
२०१६ : भारतीय तमिळ भाषिक विद्वान व लेखक कंडासामी कुप्पुसामी यांचे निधन.

कापसाचे सर्वोत्तम नऊ वाण आणि त्यांचे वैशिष्ट्ये

येत्या काही दिवसात खरीप हंगामाला सुरुवात होणार आहे. दरवर्षीप्रमाणे २०२४ च्या खरीप हंगामात देखील राज्यात मोठ्या प्रमाणात कपाशीची लागवड होण्याची शक्यता आहे. अशातच सर्वच हवामान संस्थांकडून देखील यंदा चांगला पाऊस पडणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. ज्यामुळे सध्या शेतकरी खात्रीशीर कापूस बियाण्यांच्या चाचपणीला लागल्याचे पाहायला मिळत आहे. यंदाच्या हंगामात विक्रमी कापूस उत्पादन मिळवण्यासाठी योग्य आणि खात्रीशीर बियाण्याच्या शोधात असाल तर पुढील ९ प्रजातींचे कापूस बियाणे योग्य पर्याय ठरू शकतात.

राशी सीड्स कंपनीचे राशी ७७९ कापूस वाण :

गेल्या वर्षी या जातीच्या कापसाची मोठ्या प्रमाणात लागवड झाली होती. काही शेतकऱ्यांनी या जातीपासून एकरी २२ ते २५ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळवले आहे.

साई भव्य कंपनीचे सुपर टारगेट कापूस वाण :

गेल्या वर्षी या जातीची देखील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात लागवड केली होती. या जातीपासून एव्हरेज १५ ते १६ क्विंटलचे उत्पादन मिळाले आहे. विशेष म्हणजे काही शेतकऱ्यांनी वीस क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळवल्याचे समोर आले आहे.

गेवराई शहरात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती निमित्त वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने भव्य शोभायात्रे चे आयोजन करण्यात आले होते. सकाळी आठ वाजता गेवराई शहरातील मेनरोड येथील रेणुका देवी मंदिरातून ही भव्य शोभा यात्रा काढण्यात आली. यावेळी महिलांनी एकाच रंगाच्या साडया परिधान करून तर पुरुषांनी पांढऱ्या रंगाचा वेष परिधान करून या शोभयात्रेत सहभागी झाले होते.या शोभा यात्रेमध्ये पुढे बँड पथक होते त्या मागे अतिशय शिस्ती मध्ये वीरशैव महिला भजन करत होत्या तर मागे सजवलेल्या रथमध्ये महात्मा बसवेश्वरांचा आकर्षक असा पूर्णाकृती पुतळा होता तर या शोभयात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे महात्मा बसवेश्वरांच्या वेशभूषेत आश्वारूढ असलेल्या सर्वेश सचिन राजुरे यांने सर्वांचे लक्ष वेधले होते यावेळी महिलांनी बसवनामाचा गजर करत पाऊली खेळत तसेच फुगडी खेळत या शोभा यात्रेची शोभा वाढवली.या शोभा यात्रेत बाल गोपालां सह वयोवृद्ध महिलांना देखील फुगडी खेळण्याचा मोह आवरला नाही.मेन रोड तहसील रोड मार्गे शोभा यात्रा शास्त्री चौकात आल्यावर शिवतीर्थ शोरूम च्या वतीने सर्व समाज बांधवाना सरबत देण्यात आले. त्यानंतर लाल बहादूर शात्री यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून माळी गल्ली,मोमीनपुरा, मार्गे रेणुका देवी च्या मंदिरात या शोभा यात्रेचा समारोप करण्यात आला. या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबीर देखील घेण्यात आले या रक्तदान शिबिरामध्ये ४१ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी वीरशैव लिंगायत समाजातील महिला पुरुषांना अल्पोहार देण्यात आला. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.यावेळी ऐश्वर्या सदाशिव अप्पा शेटे, श्रद्धा कल्याण स्वामी यांच्या मुली डॉक्टर झाल्या बद्दल सन्मान करण्यात आला. तर प्रतिष्ठित व्यापारी दीपक कापसे यांच्या कन्या स्नेहा व आरती कापसे यांनी उत्कृष्ट प्रकारे रांगोळी काढून जिल्ह्यात वीरशैव समाजाचे व आपल्या पालकांचे नाव लौकिक केले त्याबद्दल जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्या हस्ते नुकताच स्नेहा कापसे सत्कार करण्यात आला होता. तिच्या या कलेबद्दल त्यांच्या पालकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी युवा नेते शाम रुकर,सुधाकर संभाहारे,वैजिनाथ अप्पा मिटकर,रामेश्वर लांडगे,गणेश अप्पा कापसे,लक्ष्मण अप्पा रुकर,वैजिनाथ रुकर, सुरेश संभाहारे, पांडुरंग

आप्पा हादगुले, शंकर आप्पा परळकर,रवींद्र रुकर,योगेश कापसे,सुरेंद्र रुकर,दिपक कापसे,गणेश मिटकर, सुनील संभाहारे, प्रवीण राजुरे, नंदकिशोर कापसे,उमेश राजूरकर, गणेश रुकर, संतोष सोसे, राजेंद्र फुलशंकर,दिपक कापसे,अक्षय शेटे, शंकर संभाहारे, सचिन राजुरे, ज्ञानेश्वर फुलशंकर, महेश सोसे,आदी उपस्थित होते. तर हा सर्व शोभा यात्रेचा व जयंतीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महात्मा बसेश्वर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अजय रुकर,संदीप कापसे, गजानन कापसे, अनिकेत संभाहारे,यांनी केले होते, अमोल फुलशंकर, अमोल संभाहरे, विशाल कापसे, रोहित फुलशंकर,संदीप रुकर,गजानन संभाहारे, दत्ता टोणपे, दिनेश संभाहारे, रोहन सोसे,आदींनी परिश्रम घेतले. हा महात्मा बसेश्वर जयंती उत्सव व शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. यावेळी वीरशैव लिंगायत समाजातील सर्व महिला पुरुष बालगोपाल मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलनाचा इशारा देताच रस्त्याच्या कामाला सुरूवात

केज । प्रतिनिधी

केज शहरातील अनेक ठिकाणी अपूर्ण व अर्धवट राहिलेली कामे तात्काळ सुरु करा अन्यथा नागरिकांच्या वतीने रस्ता रोको सारखे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा केज विकास संघर्ष समितीने देताच एचपीएम कंपनीने केज शहरातील अर्धवट रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे. अनेक वेळा आंदोलने करुनही कंपनीने केवळ आश्वासने देऊनच तब्बल दोन वर्षांपासून हे काम रखडत ठेवले होते.

दरम्यान या अर्धवट कामामुळे शहरातील वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत होती. केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात गेल्या कित्येक दिवसांपासून अनेक अपघात होत आहेत, अनेकदा ट्रॅफिक जॅम होते आहे यामुळे वाहन चालक व पादचारी प्रचंड परेशान आहेत परंतु अनेकदा आवाज उठवून देखील या ठिकाणचे रस्त्याचे अर्धवट काम पुर्ण केले जात नव्हते परंतु आता अचानकपणे झोपलेली यंत्रणा जागी झाली आणि या ठिकाणी राहिलेले काम सुरू केले आहे. या अर्धवट कामामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकाची देखील बाजुंनी पडझड झाली आहे. या ठिकाणी अर्धवट काम ठेवल्यामुळे रस्त्यावर मोठे खड्डे पडलेले असायचे यामुळे अनेकांचे अपघात झाले आहेत तर अनेकांना अपंगत्व आलं आहे. मेन चौकात एवढी मोठी समस्या पाहून अनेकांनी बातम्या छापल्या. तरीही कंपनीला जाग आली नाही. नागरिकांनी आंदोलने केली परंतु संबंधित यंत्रणेला कधीच जाग आली नाही मात्र काल केज विकास संघर्ष समि तीने १६ मे रोजी केजडी नदीच्या पुलावर तीव्र रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे एचपीएम कंपनी लगेचच ताळ्यावर आली. आणि रात्रीतून या ठिकाणी रस्ता बनवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. पण हे उशिरा सुचलेले शहाणपण असल्याने लोकांनी या यंत्रणेवर नापसंती व्यक्त केली आहे. सुरू केलेले हे काम लवकरात लवकर पुर्ण व्हावं एवढीच अपेक्षा शहरवासीयांना व वाहनचालकांना आहे.

राक्षसभुवन येथे भीषण पाणी टंचाई

राक्षसभुवन । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील शनीचे गाव असलेल्या राक्षसभुवन येथे मागील काही दिवसांपासून भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. नदी उशाला अन्? कोरड घशाला' अशी अवस्था तालुक्यातील गोदाकाठी असलेल्या राक्षसभुवनची झाली आहे. गावात अनेक दिवसांपासून पाणीटंचाई आहे. नळ योजना असूनही नळाला महिना-महिना पाणी येत नाही. त्यामुळे नागरिकांना बैलगाडी, मोटारसायकलवरून पाणी आणावे लागते. श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथून गोदावरी नदीचे पात्र गेलेले आहे. मात्र याच गावात सध्या मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई जाणवत आहे. नळाला पाणी येत नसल्याने गावातील नागरिक, महिलांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. गावात नवी पाणीपुरवठा योजना राबवली. मात्र ती अजून सुरू झाली नाही.

त्यामुळे गावातील महिलांना व नागरिकांना शेतातील विहिरींवरून पाणी आणावे लागते. राक्षसभुवन तीर्थक्षेत्र असल्याने येथे दररोज दहाव्याचे कार्यक्रम होतात. नागरिकांना विकतचे पाणी घेऊन दहावा करावा लागतो. तसेच गावातील अंतर्गत नाल्याची वेळोवेळी साफसफाई होत नसल्याने नाल्या तुंबल्या आहेत. ग्रामस्थांनी आपापल्या परिने पाण्याची सोय केली आहे. काहींनी घरात बोअर घेतले तर काही विहिरीवरून पाणी आणतात. काहीजण नदीपात्रात झरे खोदून पाणीटंचाईचा सामना करतात. धरण उशाला असताना राक्षसभुवनकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. माळरानावरील नागरिकांनी पाण्याचा सामना करणे साहजीक आहे. मात्र नदी गाठच्या गावांनाही पाणी टंचाईचा भीषण संकटाला तोंड द्यावे लागत असल्याचे दिसून

सी.सी.टी.व्ही.फुटेज आधारे चोरीतील आरोपी धारूर पोलीसांनी पकडला

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारुर पोलीसांनी चोरीच्या गुन्हयातील आरोपीस सी सी टी व्ही फुटेज अधारे तात्काळ शोध घेवुन बेड्या ठोकुन आरोपीची १४ दिवस न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. पोलीसाचे या कारवाईचे सर्वत्र कौतूक होत आहे.दि १/२/२०२४ रोजी धारुर पोलीस स्टेशनचे नव्यानेच रुजु झालेले प्रभारी अधिकारी डी बी वाघमोडे सहा पोलीस निरीक्षक यांनी चोरीचे मुद्देमालासह आरोपीस ताब्यात घेवुन बेड्या ठोकुन १४ दिवस केली न्यायालयीन कोठडीत रवानगीकेली आहे. रुई धारुर येथील रहिवासी उमेश दगडोबा सोळंके यांनी दि १०/५/२०२४ रोजी पोस्टेला फिर्याद दिली कि अंबेडकर चौक धारुर येथे माझे संघर्ष पंम्चर नावाचे पत्रयाचे शेड मध्ये दुकान असुन त्या ठिकाणी बरेच टायर व पंम्चर काडण्यासाठी लागणारे साहीत्य ठेवलेले असते. दि ९/५/२०२४ रोजी संध्याकाळी मी साडे आठ वाचे सुमारास दुकाण बंद करुन घरी निघुन गेलो. दि १०/५/२०२४ रोजी सकाळी आकरा वाजता मी माझे दुकाण उघडण्यासाठी अंबेडकर चौकात दुकानाकडे गेलो असता मला माझ्या दुकाणाचा पत्र उचकटलेला दिसला तेंव्हा मी माझ्या दुकाणाचा दरवाजा उघडुन आत जावुन पाहीले असता मला दुकाणात दोन जॉक किमती १८०००/- रुचे दिसले नाहीत. अशी फिर्याद दिल्याने तात्काळ पोस्टेला गुरण १२५/२०२४ कलम ४५७,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपास पोह/१५७३ गवळी यांचे कडे देण्यात आला होता.

तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी पोस्टेचे पोह/१५७३ गवळी पोह/४५३ भुसारी पोअ/२३०० कदम यांचेसह तात्काळ घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली घटने बाबत वरीष्ट अधिकारी यांना माहीती देवून त्यांचे मार्गदर्शन घेवुन घटनास्थळा जवळ असलेले सी सी टी व्ही कॅमेरे चेक केले असता रात्री अंदाजे साडे तीन वाचे सुमारास एक इसम हातात जॉक घेवुन जात असलेले फुटेज मिळुन आले. सदर फुटेज मधील इसमाचा फोटो गुप्त बातमीदार यांना दाखवुन आरोपी बाबत माहीती घेतली असता त्यांचे नाव मोहमदआरेफ अब्दुल रज्जाक शेख रा धारुर असे असल्याचे समजल्याने त्याचे राहते ठिकाणचा पत्ता घेवुन त्यांचा शोध घेतला असता आरोपी हा झोपडपटी संभाजी नगर येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन आरोपीला पोलीस खाक्या दाखवुन, विश्वासात घेवुन विचारपुस केली असता अरोपीने गुन्हा केल्याचे कबुल केले व गुन्हयातील चोरी गेला माल जॉक किमती १८०००/-रुचे त्याचे कडुन हस्तगत करण्यात आले. असुन आरोपीस गुन्हयात अटक करुन मा न्यायालयात हजर केले असता मा न्यायालयाने त्यांची १४ दिवस न्यायालयीन कोठडीत केली रवानगी केली सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकुर, अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके उपधिक्षक कमलेशमिना यांचे मार्गदर्शनाखाली धारुर पोलीस स्टेशनचे सपोनि डी बी वाघमोडे, पोह/ १५७३ गवळी, पोह/४५३ भुसारी, पोअ/ २३०० कदम यांनी केली या कारवाईचे सर्वत्र कौतूक होत आहे.

हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील मातकुळी येथे श्रीसंत वामनभाऊ यांच्या कृपार्शिवादाने व महंत विठ्ठल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचे पंचवीस वर्ष पुर्ण झाले असून रौप्यम होत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाची रविवार दिनांक १२/५/२०२४ रोजी गहिनीनाथगडाचे महंत विठ्ठल महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने मोठ्या उत्साहात सांगता झाली.

गेल्या पंचवीस वर्षापासून चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते यावर्षी रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त संत तुकाराम महाराज यांचे वंशज ह. भ. प. पुंडलीक महाराज मोरे, संत एकनाथ महाराज यांचे वंशज ह. भ. प. योगिराज महाराज गोसावी, संत नामदेव महाराज यांचे वंशज ह. भ. प. केशव महाराज नामदास पंढरपूर, वारकरी मुक्ताई संस्थान जळगावचे ह. भ. प. भरत महाराज पाटील, जोग महाराज वारकरी संस्था चे ह. भ. प. उमेश महाराज दशरथे, मातकुळी भुषण ह. भ. प. डॉ. अमित महाराज डोके व सलग पंचवीस वर्षे नित्य सेवा करणारे वै. ह. भ. प. वाम नभाऊ महाराज यांचे शिष्य रघुनाथ महाराज धामणगावकर यांची किर्तन सेवा संपन्न झाली यावेळी विष्णू सहस्त्रनाम हरिपाठ, हरीजागर, गाथा भजन, काकडा भजन आदी कार्यक्रम संपन्न झाले तर संगीत संत चरीत्र कथा ह. भ. प. श्रीहरी महाराज खेडकर आळंदी यांनी संपन्न केली. रविवार दिनांक १२५ २०२४ रोजी सकाळी नऊ वाजता गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली यावेळी कार्यक्रमाला मातकुळी परिसरासह पंचक्रशीतील भाविक भक्तांनी उपस्थिती लावली होती काल्याच्या कीर्तनानंतर आलेल्या भाविक भक्तासाठी महाप्रसादाचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते.

जागतिक योग दिनानिमित्त योग महोत्सव

बीड । प्रतिनिधी

जागतिक योग दिन २१ जून २०२४ च्या अनुषंगाने काकू-नाना प्रतिष्ठान, पतंजली योग समिती बीड, सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ९ व्या जागतिक योग दिनानिमित्त दिंडी आपल्या दारी हे अभियान दिनांक १५ मे पासून ते २१ जून २०२४ पर्यंत राबवण्यात येणार आहे. आठ वर्षापासून बीड शहरवासीयांचे आरोग्य अबाधित राहण्यासाठी काकू-नाना प्रतिष्ठान, पतंजली योग समिती बीड व सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने योग दिंडी आपल्या दारी हे अभियान बीड शहरातील विविध प्रभागात राबवण्यात येणार आहे. प्रत्येक प्रभागासाठी.. प्रभागातील प्रत्येकासाठी.. योग दिंडी आपल्या दारी अभियान २०१४ पासून २१ जुन हा जागतिक योग दिन म्हणून मानण्यात येत आहे. पहिल्या जागतिक योग दिनानिमित्त बीड शहरात ७५ दिवसांची योग दिंडी राबवण्यात आली. २०१५ साली १०१ दिवसाची योग दिंडी राबवण्यात आली व २०१६ पासून ३६५ दिवसांची योग दिंडी बीड शहरात अविरत चालू आहे. यावर्षीची योग दिंडीची सुरुवात दिनांक १५ मे पासून सुरू होत आहे. शिबीर क्रमांक १ सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय बीड दिनांक १५ मे ते २० मे २०२४ पहाटे ५ ते ७ या वेळेत संपन्न होणार आहे. शिबिर क्रमांक: २ पारस नगरी माने कॉम्प्लेक्स बीड. दिनांक :२१ मे ते २७ मे २०२४ शिबिर क्रमांक: ३ शासकीय आय.टी.आय. जवाहर कॉलनी बीड. दिनांक: २८ मे २ जून २०२४ शिबीर क्रमांक: ४ मौजकर यांचे टर्फ विकेट, जिजामाता चौक, जानवळे हॉस्पिटलच्या समोर. दिनांक ३ जून ते ७ जून २०२४. शिबिर क्रमांक: ५ छत्रपती संभाजी राजे क्रीडांगण (मल्टीपर्पज ग्राउंड) बीड. दिनांक ८ जून ते १४ जून २०२४. शिबिर क्रमांक ६: आशीर्वाद लॉन्स बार्शी रोड बीड. दिनांक १५ जून ते २१ जून २०२४. सर्व शिबिरांसाठी वेळ एकच राहील पहाटे ५.०० ते ७.००. ह्या पद्धतीने योग दिंडीचे स्वरूप राहणार आहे. या योग दिंडीचा लाभ सर्व बीड शहरवासीयांनी घ्यावा असे आवाहन माजी मंत्री जयदत्तजी आण्णा क्षीरसागर, बीड जिल्हा पतंजलीचे सर्वेसर्वा ॲड. श्रीराम लाखे व पतंजली योग समितीचे सर्व जिल्हा पदाधिकारी व योगशिक्षक यांनी केले आहे.

निगमानंद बाबा जन्मोत्सव सोहळ्या निमित्त नांदेवाली येथे आंखड हरिनाम सप्ताह सुरू

शिरूरकासार । प्रतिनिधी

नांदेवाली येथे स्वामी निगमानंद महाराज (मच्छिंद्रगड) यांच्या जन्मभूमी आसलेल्या नांदेवाली येथे जन्मोत्सवानिमित्त वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण सोहळा महंत स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली भव्य दिव्य स्वरूपात संपन्न होत आहे.

त्यानिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे त्यामध्ये काकडा भजन, ग्राम प्रदक्षिणा, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम महाराज गाथा भजन ,भावार्थ रामायण, गीत रामायण, ज्ञानेश्वरी प्रवचन ,हरिपाठ, हरिकीर्तन, हारीजागर संपन्न होत आहे .संगीत रामायण प्रसिद्ध रामायणाचार्य लक्ष्मण महाराज शिरपे यांचे व भावार्थ रामायणाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहात प्रवचनकार सुरेश महाराज थिटे, शिवाजीदादा शेळके ,अण्णासाहेब महाराज थिटे, अर्जुन थिटे सर , सुदाम महाराज थिटे ,तीर्थराज महाराज पठाडे, दादासाहेब महाराज थिटे, यांचे प्रवचन होत आहे तर कीर्तनकार ह.भ.प बाबा गिरी महाराज नाकलवाडी, पांडुरंग महाराज गिरी, शिवानंद महाराज शास्त्री ,उद्धव महाराज शास्त्री, ज्ञानेश्वर महाराज तांबे नेवासा, महेश महाराज मडके, रामेश्वर महाराज शास्त्री यांचे कीर्तन संपन्न होत आहे शुक्रवार १७ मे रोजी महंत स्वामी जनार्दन महाराज श्रीक्षेत्र संस्थान मच्छिंद्रगड यांचे अमृतुल्य काल्याचे कीर्तन होणार आहे नंतर महाप्रसादाने सांगता होईल. महाप्रसादाचे आयोजन रमेश रामराव थिटे ,सुदर्शन शामराव थिटे, यांनी केले आहे या कार्यक्रमाचे भरदार सूत्रसंचालन दादासाहेब महाराज थिटे हे करत आहेत या सप्ताहाचा ला भाविक भक्ताने घ्यावा अशी आव्हान नांदेवाली ता.शिरूर कासार ग्रामस्थांनी केली आहे.स सप्ताहात नामांकित गायनाचार्य , मृदंगाचार्य, हार्मोनियम वादक उपस्थित राहात आहेत.नांदेवाली गावाला या स्वामी निगमानंद महाराज मच्छिंद्रगड यांच्या जन्मोत्सव सोहोळ्या ने पंढरपूर आवतारले आहे.

भाजपा युवा मोर्चा जामखेड तालुका उपाध्यक्षपदी विशाल भांडवलकर

जामखेड । प्रतिनिधी

जामखेड तालुक्यातील चौंडी येथील विशाल भांडवलकर यांची भाजपा युवा मोर्चा जामखेड तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून यांनी मागील काळामध्ये पक्षाच्या ध्येय धोरणे एकनिष्ठ राहुन काम केले आता पक्षाने त्यांच्या वर भाजपा तालुका युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष पदी निवड करुन निष्ठावान कार्यकर्त्याला दिला न्याय.आजपर्यंत माजीमंत्री तथा आमदार प्रा.राम शिंदे यांच्या विचाराने भाजप पक्षामध्ये काम केले आहे. यावेळी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तालुका अध्यक्ष बाजीराव गोपाळघरे यांनी विशाल भांडवलकर यांना निवडीचे पत्र दिले. विशाल भांडवलकर यांची निवड झाल्याबद्दल आमदार प्रा. राम शिंदे ,अजय काशिद, बाजीराव गोपाळघरे,पांडुरग उबाळे, विशाल शिंदे,अशोक देवकर, आप्पा उबाळे,दिनेश शिंदे,आलेश शिंदे, सतिष लांबाटे,बाबु भोंडवे,आंजिक्य शिंदे,संतोष कुरडुले आदींनी अभिनंदन केले.

शांताबाई सोपान डापकर यांचे निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील संगम येथील रहिवासी असलेल्या शांताबाई सोपान डापकर यांचे दि.१२ मे २०२४ रविवारी रात्री ११.२० दरम्यान ७७ व्या वर्षी हृदविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले.शांताबाई डापकर ह्या दिंद्रुड सोसायटीचे व्हा.चेअरमन मधुकर नाना डापकर यांच्या मातोश्री होत्या,त्या अत्यंत मनमिळावू ,शांत ,स्वभावाच्या होत्या, त्यांच्या असे अचानक जाण्याने गावात व आजूबाजूच्या परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात नवनाथ सोपानराव डापकर,मधुकर सोपान डापकर,परमेश्वर सोपानराव डापकर,हे तीन मुले,तीन मुली,सुना, जावई, नातवंडे, पत्रउंड असा त्यांचा मोठा परिवार आहे, त्यांच्या दुःखात हंगे व दै.अक्षर वार्ता परिवार सहभागी आहे.शांताबाई डापकर ह्या दै.अक्षर वार्ता चे संपादक संजय हंगे यांच्या सासूबाई होत्या.

जनतेच्या प्रश्नावर भाजपा गप्प

देशभरातील हवा बदलली, शशी थरूर यांचा विश्वास

नवी दिल्ली । वृतसंस्था

लोकसभेची ही निवडणूक साधारण निवडणूक नसून भारताचा आत्मा सुरक्षित ठेवण्यासाठीचा हा संघर्ष आहे. भाजपाने लोकशाही, संविधान धोक्यात आणले आहे, विविधतेला खुलेआमपणे छेद दिला आहे. तीन टप्प्यातील मतदान झाले असून, दक्षिण भारतातच नाही तर सर्वच राज्यात हवा बदललेली दिसत आहे. ४ जूनला दिल्लीतून भारतीय जनता पक्षाचे सरकार जाऊन इंडिया आघाडीचे सरकार येईल, असा विश्वास काँग्रेसचे वरिष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री शशी थरूर यांनी व्यक्त केला आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना शशी थरूर पुढे म्हणाले की, जात, धर्म, भाषा, प्रांत कोणताही असो सर्वप्रथम आपण भारताचे नागरिक आहोत असे संविधानाने स्पष्ट केले आहे. परंतु भारतीय जनता पक्षाचा विचार तसा नाही. भाजपाने नागरिकता मध्ये धर्म आणला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जाहीरपणे जे शब्द वापरत आहेत ते शब्द आपण बंद घरातही वापरू शकत नाही, हे अत्यंत लांछनास्पद असून देश आणि राजकारणातही ते योग्य नाही. भाजपाचे राजकारण पाहता सर्व समविचारी पक्षांनी एकत्र येऊन लढाईत भाग घेतला आहे. ४ जूननंतर खऱ्या अर्थाने सर्व जाती धर्माचा विकास करणारे व सर्वांना सोबत घेऊन जाणारे सरकार येईल. पुढे बोलताना शशी थरूर म्हणाले की, निवडणुकीच्या प्रचारात भारतीय जनता पक्ष बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न यांच्यावर बोलत नाही. जनतेचे ज्वलंत प्रश्न टाळून गैर महत्वाच्या मुद्द्यावरच भाजपा व पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत आहेत. राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना चर्चेचे खुले आव्हान दिले आहे पण मोदींनी ते स्विकारले नाही. युपीए सरकार असताना डॉ. मनमोहनसिंह हे नेहमी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी मात्र आता स्क्रिप्टेड मुलाखती देत आहेत.

बीड जिल्ह्यात सर्वत्र शांततेत मतदान

जिल्ह्यातील दिग्गज नेत्यासह वयोवृद्ध, अपंग महिलांनी केले मोठ्या प्रमाणात मतदान

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये सोमवारी लोकसभेसाठी मतदान झाले. जिल्ह्यामध्ये तालुका निहाय आकडेवारी पाहता सरासरी ६८ टक्के मतदान झाले .जिल्हा सर्वत्र काही ठिकाणी किरकोळ प्रकार वगळता शांततेत मतदान झाले. मतांची आकडेवारी कोणाच्या बाजूने कल देते हे आता मतदान मोजल्यानंतरच कळणार आहे.

बीड जिल्ह्यामध्ये आष्टी येथे ६९ टक्के मतदान झाले तर बीडमध्ये जवळपास ६२ टक्के, गेवराई मध्ये ६५% केज मध्ये ६८% ,माजलगाव मध्ये जवळपास ६८ टक्के मतदान झालेले आहे तर परळी मध्ये सर्वाधिक ७५ टक्के मतदान झाले.

बीड लोकसभा अंतर्गत सहा विधानसभा मतदारसंघ येतात. या सहाही विधानसभा मतदारसंघांमध्ये सर्वाधिक मतदान आष्टी विधानसभा मतदारसंघात झाल्याचे दिसून येत आहे .वाढलेली मतांची टक्केवारी कोणाच्या बाजूने कौल देणार हे मतमोजणीनंतरच कळणार आहे. दुपारपर्यंत मतदारांची मतदान केंद्रावर गर्दी होती. मात्र दुपारनंतर ही गर्दी कमी झाली, कडक उन्हात मतदान केंद्रावर जाण्यासाठी लोक धजत नव्हते त्यानंतर पाच ते सहा या दरम्यान जवळपास पाच टक्के मतदान झाल्याचे दिसून येत आहे. मतांची एकूण आकडेवारी पाहता मतदानासाठी मतदारांचा उत्साह फारसा दिसून येत नव्हता. त्यातच मतदारांसाठी असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले होते. मात्र बऱ्याच ठिकाणी हे पेंडॉल दिसलेच नाहीत .याशिवाय पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करू असे सांगण्यात आले होते. मात्र अनेक मतदान केंद्रावर पिण्याचे पाणीही आढळून आले नाही. तर आशा वर्कर यांच्यामार्फत आरोग्य सुविधा दिले जाणार असल्याचे सांगण्यात आले. या सुविधाही बऱ्याच केंद्रावर दिसून आले नाहीत. सर्व मतदान केंद्रावर सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली होती. मतदान करताना सर्व नियमांचे पालन करूनच मतदान झाले. त्यामुळे मतदान केंद्रावर फारसा गोंधळ झाला नाही .बऱ्याच अंशी मतदान हे शांततेत पार पडले. मतदान चालू असताना जिल्हाभरात जिल्हा पोलीस अधीक्षक स्वतः फिरत होते. पोलीस अधिकारी सतर्क होते. याबरोबरच महसूल प्रशासनातील प्रमुख अधिकारीही सर्व ठिकाणी फिरताना दिसले. त्यामुळे मतदान व्यवस्थित आणि शांततेत पार पडण्यास मदत झाली. सुरुवातीपासूनच लोकसभा मतदारसंघासाठी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी व्यवस्थित नियोजन केल्याने मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. ज्या ठिकाणी मोबाईलचा वापर करणे शक्य नव्हते. अशा ठिकाणी वाकी टाकीचा वापर करण्यात आला. बऱ्याच ठिकाणी तांत्रिक यंत्रणा सज्ज होती. मशीन मध्ये बिघाड झाल्यानंतर तात्काळ दुसरी मशीन उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणा सतर्क होती. या सर्व बाबीमुळे मतदान शांततेत पार पडले मात्र कडक उन्हामुळे मतदानाची टक्केवारी थोडीफार घसरली. बीड जिल्ह्यामध्ये अनेक दिग्गजांनी मतदान केले यात उमेदवार महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे, महा आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, पालकमंत्री धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी मंत्री सुरेश धस माजी मंत्री प्रकाश सोळंके माजी मंत्री सुरेश नवले, माजी मंत्री बदामराव पंडित ,आर्दीसह जिल्ह्यातील सर्व आमदार, पोलीस अधीक्षक, जिल्हा अधिकारी यांनीही आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

शिरूर तालुक्यात ७० टक्केच्या वर मतदान

शिरूर । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये आज झालेल्या मतदान प्रक्रियेमध्ये शिरूर तालुक्यातील मतदानाची टक्केवारी वाढली असून गावागावातून आलेल्या आकडे नुसार एकूण मतदानाच्या ७० टक्केच्यावर मतदान झाल्याचे समोर आले आहे. सहाजिकच या टक्केवारीवरून लोकसभा निवडणुकीमध्ये मतदाराचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला आहे.

बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये झालेल्या अटीतटीच्या लढतीमध्ये प्रचंड प्रमाणामध्ये जातिवाद पाहायला मिळाला आहे. सत्ताधाऱ्यांच्या गोठा मध्ये असलेल्या भाजपाचे उमेदवार पंकजाताई मुंडे यांना पराभूत करण्यासाठी व बजरंग सोनवणे यांना विजयी करण्यासाठी मराठा समाज बांधवांनी यावेळी मोठी आक्रमकता धरल्याने यावेळी लोकसभा निवडणुकीमध्ये मोठी चुरस निर्माण झालेली पाहायला मिळाली. तर इकडे पंकजा मुंडे ह्याच विजयी व्हाव्यात पंकजा मुंडे विजयी होत झाल्या तर ओबीसी बांधवांची प्रतिष्ठा कायम राहील प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी इकडे वंजारी समाजासह ओबीसी बांधव मोठे आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. परिणामी जिल्ह्यामध्ये कधी नव्हे तो एवढा जातीयवाद उफाळून आल्याचे चित्र निर्माण झाले होते. राजकीय नेत्यापेक्षा दोन्ही समाजातील मतदारांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची मानून स्वतःला निवडणुकीमध्ये यामुळे गावागावांमध्ये मोठी चुरस निर्माण झाली आहे. या चुरशीतूनच दोन्ही समाजाच्या वतीने बाहेर गावी गेलेल्या मतदारांना मतदानासाठी गावी घेऊन येणे. गावामध्ये कोणी मतदानाचे राहणार यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केल्याने गावागावातून लोकसभा निवडणुकीला मोठे महत्त्व प्राप्त झाले आणि यातूनच मतदानाचा ही टक्का वाढला आहे. सोमवारी सायंकाळी ६ वाजल्यानंतर गावा गावातून हाती आलेल्या आकड्यानुसार गावातील एकूण मतदानाच्या ७० टक्क्या पेक्षा जास्त मतदान झाल्याचे ऐकायला मिळत आहे. असे असले तरी तालुक्यामध्ये शांततेत मतदान प्रक्रिया पार पडल्याने प्रशासकीय अधिकारी,कर्मचाऱ्यांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.

नारायणवाडीत काही काळ तणावपूर्ण वातावरण

नारायणवाडी हे मराठा समाजाचे गाव असल्याने या गावांमध्ये अधिकची पोलीस कुमक मागून प्रशासनाच्या वतीने गावकऱ्यावर दबाव तंत्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप करत गावकऱ्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या विरोधात संताप व्यक्त केला होता. गावामध्ये कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडला नाही मग त्या ठिकाणी बंदूकधारी पोलिसांना बोलावून घेऊन गावावर धाक निर्माण करण्याचा हा सत्ताधाऱ्यांचा डाव आहे. यामुळे या ठिकाणी होणाऱ्या मतदानावर विपरीत परिणाम होऊ शकतो असा अनेकांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत

आष्टी तालुक्यातील विविध ठिकाणी वयोवृध्द नागरिकांचे मतदान

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील विविध मतदान केंद्रावर मतदारांनी उत्साहात मतदान केले.यात वयोवृद्ध नागरिकांचा ही सहभाग होता.आष्टी येथील मतदान केंद्रावर आष्टीचे सुपुत्र तथा जलसंधारण आयुक्त सुनील चव्हाण यांनी त्यांचे वयोवृध्द वडील माजी तहसिलदार साहेबरावजी चव्हाण,आ.सुरेश धस,आ.बाळासाहेब आजबे,माजी आ. भीमराव धोंडे,माजी आ.साहेबराव दरेकर, विजाय गोल्हार यांच्यासह मान्यवरांनी मतदान केले, आष्टी तालुक्यातील फत्तेवडगाव येथील ९० वर्षीय शशिकला यशवंत काळे या आजीने मतदान केंद्रावर चालत येऊन मतदान केले.कडा सहकारी साखर कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दिलीप काळे यांच्या मातोश्री असलेल्या शशिकला काळे यांचे दोन महिन्यापूर्वी पायाचे ऑपरेशन झाले होते तरी ही त्यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.कडा येथे लोकशाहीचा उत्सव समजल्या जाणाऱ्या लोकसभा निवडणुकीत १०४ वय असणाऱ्या कौशल्याबाई दळवी यांनी मतदानाचा हक्क बजावला. जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांचे चुलते भगवान दशरथ बोडखे (वय १०७) यांनी सराटेवडगाव अंतर्गत येणाऱ्या आनंदवाडी येथे मतदान करत लोकशाही उत्सवात सहभाग घेतला.

यांच्यासह बबन रामभाऊ रामभाऊ बोडखे (वय ६०) यांचे दोन्ही पाय निकामे असताना चालता येत नसताना देखील ते आनंदवाडी मतदान केंद्रात जाऊन तर ३८ वर्षीय शिवाजी तुकाराम बोडखे,आणि संधीवाताने पुर्णपणे पाय निकामे झाले असताना पंकज भानुदास बोडखे (वय २५),श्रीमती जैतुनबी जाफरभाई शेख (वय ९०) ,गहिनीनाथनाना बोडखे (वय ९५) यांनी आपला मतदानाचा हक्क बजवला.

प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी त्यांच्या कुटुंबियांसह मतदान करून बजावले कर्तव्य

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी त्यांच्या कुटुंबियांसोबत मतदानाचा हक्क बजावला. भारतीय लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे मतदान दिन. या महोत्सवात देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येकाला दिलेल्या एका मतदानाच्या हक्का नुसार आज महाराष्ट्र राज्यातील चौथ्या टप्प्यातील मतदानाच्या दिवशी राजकिशोर मोदी यांनी त्यांच्या आई, पत्नी, मुलगा व सून या कुटुंबियांसोबत मतदान केंद्रावर जाऊन बीड लोकसभा मतदारसंघातील भावी खासदार निवडुन येण्याच्या दृष्टीने त्यांना मतदान केले.

राजकिशोर मोदी यांनी स्वतंत्र मतदान करत अंबाजोगाई शहरातील इतर सर्व मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले. शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या मतदान केंद्रावर जाऊन राजकिशोर मोदी यांनी मतदान करून भारतीय लोकशाहीसाठी आपले कर्तव्य बजावले. राष्ट्र

बळकटीसाठी ,नवनिर्माणसाठी त्याचबरोबर देशाच्या अखंड उन्नतीसाठी प्रत्येकाने मतदान करणे अत्यावश्यक असल्याच्या भावनेने त्यांनी स्वतः मतदान करून इतरांना मतदानाचा हक्क बजावण्याचा संदेश दिला.

चार जूननंतर राज्यातील दोन पक्ष संपणार - बावनकुळे

नाशिक । प्रतिनिधी

शरद पवार यांनी महाविकास आघाडीचा तयार केलेला फुगा लोकसभेच्या निवडणूक निकालानंतर फुटणार आहे. निवडणुकीनंतर राज्यातील दोन पक्ष संपणार आहेत. मशाल आणि तुतारी हे दोन्ही पक्ष आता चार जूननंतर राज्यात दिसणार नाहीत, अशी टिका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. चौथ्या टप्प्यात मतदान झालेल्या ११ जागा महायुती जिंकेल, पुढचा पाचवा टप्पा देखील आम्हीच जिंकणार असल्याचा दावाही बावनकुळे यांनी केला आहे. .

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ नाशिक दौऱ्यावर आलेल्या बावनकुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी महाविकास आघाडीचे नेते शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यावर त्यांनी टीकास्त्र डागले. बावनकुळे म्हणाले की,

बारामतीमध्ये सुप्रिया सुळे पराभूत होणार आहे. पवारांनी महाविकास आघाडीचा तयार केलेला फुगा चार तारखेनंतर फुटणार असून मविआचे तुकडे तुकडे होणार आहे. राज्यातील दोन पक्ष संपणार आहेत. मशाल आणि तुतारी दोन पक्ष आता चार तारखेला राज्यात दिसणार नाही, असे बावनकुळे यांनी सांगितले. खा. संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या आरोपाबाबतही बावनकुळे भाष्य केले आहे. जेव्हा पराभव होतो, पराभवाचे लक्षणे दिसतात, तेव्हा असे वक्तव्य करणे नॉर्मल आहे. हे ते बोलतच राहणार, पराभव जसा जवळ दिसेल, ईव्हीएम खराब आहे. मशीन खराब झाली आहे. मशीनमध्ये दोष आहे, असे आरोप ते करतील. परसेंटेजचा दोष सांगतात. निवडणूक निर्णय अधिकारी शेवटपर्यंत सांगत नाही. यांना आता पराभव दिसत असल्याने असे लक्षण दिसत आहे, असा टोला त्यांनी राऊत यांना लगावला.

राऊत यांनी नाशिक महापालिका हद्दीतील आठशे कोटींचा भूसंपादन घोटाळा बाहेर काढणार, असा इशारा दिला आहे. यावर बावनकुळे यांनी बोलण्यास नकार दिला. सकाळी ते बोलले म्हणून आम्ही बोलले पाहिजे असे काही नाही असे सांगत बावनकुळे यांनी राऊत यांचे आरोप फेटाळून लावले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पिंपळे जगताप येथील १०६ वर्षाच्या आजींनी मतदान केंद्रावर जावून केले मतदान

जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या कार्यतत्परतेमुळे गर्भवती महिलेने बजावला मतदानाचा हक्क

गर्भवती महिलेने रुग्णालयात जाण्यापूर्वी बजावला मतदानाचा हक्क

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यात पुणे, मावळ व शिरुर लोकसभा मतदारसंघात मतदान सुरू असून यामध्ये ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला, गर्भवती महिला, तृतीयपंथीय, नवमतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. ज्येष्ठ नागरिकांची मतदानाप्रती असलेली जागरुता कमालीची असून त्यांनी सक्रीय सहभाग घेऊन मतदान केले आहे. भारत निवडणूक आयोगाच्यावतीने मतदान केंद्रावर ज्येष्ठ नागरिकांकरीता असलेल्या सुविधांमुळे त्यांना सुलभरित्या मतदान करता आले.

शिरुर विधानसभा मतदारसंघात पिंपळे जगताप केंद्रावर रखमाबाई दत्तोबा शेळके या १०६ वर्ष वयाच्या, अनुसया काशिनाथ सोंडेकर या १०५ वर्ष वयाच्या आजींनी टपाली मतदानाचा पर्याय न स्वीकारता मतदान केंद्रावर येऊन मतदान केले. शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात ९८ वर्षाच्या विमला दत्तात्रय शिंगणे, पिंपरी विधानसभा मतदारसंघातील ९८ वर्षाच्या लक्ष्मीबाई गराडे, ९० वर्षाच्या कलावती कांबळे यांनी मतदान केंद्रावर जावून मतदानांचा हक्क बजावला. तरुण मतदारांना लाजवेल अशी इच्छाशक्ती त्यांच्या अंगी दिसून आली.

शालू राठोड ह्या प्रसुतीकरीता त्यांच्या माहेरी चाकण येथे गेल्या होत्या. त्यांचे नाव शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीत असल्याने त्यांनी प्रसुतीची तारीख १४ मे असतानादेखील रुग्णालयात जाण्यापूर्वी मतदान करण्याची प्रशासनाकडे इच्छा व्यक्त केली. जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांच्या सुचनेनुसार उपजिल्हाधिकारी अर्चना तांबे यांनी सदर

महिलेला चाकण येथून शिवाजीनगर येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग येथील मतदान केंद्रावर आणण्यासाठी विशेष रुग्णवाहिकेची व्यवस्था केली. श्रीमती राठोड यांनी दुपारी मतदान केंद्रावर येऊन मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर त्या येरवडा येथील राजीव गांधी रुग्णालयात त्या प्रसूतीसाठी दाखल झाल्या.

ज्येष्ठ नागरिकांनी सकाळपासून मतदान केंद्रावर गर्दी केली होती. जिल्ह्यातील तिन्ही मतदार केंद्रात हेच चित्र पहायला मिळाले. काही ज्येष्ठ व्यक्ती आपल्या प्रथम मतदान करणाऱ्या नातवंडांसह तर काही आपल्या वयोवृद्ध मित्रांसह मतदानाला आले. काही ठिकाणी प्रशासनातर्फे नेमलेल्या स्वयंसेवकांनी या मतदारांना मतदान केंद्रापर्यंत नेण्यासाठी सहकार्य केले. त्यांच्यासाठी व्हीलचेअरचीदेखील व्यवस्था केली होती. मतदान केंवरील सुविधांबाबत या मतदारांनी समाधान व्यक्त केले.

पुणे कॅन्टोंनमेन्ट विधानसभा मतदारसंघातील दिव्यांग मतदारांच्या चेहऱ्यावर मतदान केल्यानंतर समाधानाची भावना दिसून आली. भारत निवडणुक आयोगाच्यावतीने ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांसाठी करण्यात आलेल्या सुविधांबाबत तसेच मतदान केंद्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदानाच्यावेळी सहकार्य केल्याबाबत त्यांनी आभार मानले. मतदान आपला हक्क आहे, एक राष्ट्रीय कर्तव्य समजून नवमतदारांनी मतदान केले पाहिजे, अशा प्रतिक्रिया यावेळी मतदारांनी व्यक्त केल्या.

डॉ. सुहास दिवसे, जिल्हाधिकारी: रखमाबाई, अनुसया आजी, शालू राठोड, दुर्धर आजाराने ग्रस्त असलेले मात्र मतदानासाठी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येत असलेले तरुण, दिव्यांग नागरिक हे आपले मतदानाचे प्रेरणादूतच आहेत. अशा मतदारांकडून प्रेरणा घेऊन समाजातील सर्व पात्र मतदारांनी प्रत्येक निवडणुकीत मतदान करायला हवे. अर्चना तांबे, उपजिल्हाधिकारी तथा स्वीप समन्वयक: शालू राठोड यांनी रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी मतदान करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांची राष्ट्रीय कर्तव्याप्रती असणारी भावना इतरांनाही प्रेरक आहे. त्यांना प्रशासनाच्यावतीने सहकार्य करण्यात आले.

भटक्या कुत्र्यांची नागरिकांमध्ये दहशत!

पुणे । प्रतिनिधी

नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे. वडगाव शेरी, खराडी, विमाननगर आणि कल्याणीनगरमध्ये लहान मुले व नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेण्याच्या घटना दररोज घडत आहेत. यामुळे परिसरातील रहिवाशांत या कुत्र्यांची दहशत पसरली आहे. शहर व उपनगरांत भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नागरिकांकडून कचर्यात शिळे अन्न टाकले जात असल्याने कचर्याच्या परिसरात या कुत्र्यांच्या वावर वाढला आहे. भटकी कुत्री पकडण्यासाठी महापालिकेचे श्वान पथक आहे. मात्र, या पथकाला कुत्री सापडत नाही.

श्वान पथकांची गाडी पाहिल्यानंतर कुत्रे पसार होतात. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार वर्षाला जवळपास

दहा ते बारा हजार नागरिकांना कुत्री चावा घेतात. महापालिकेने वर्षात सात ते आठ हजार कुत्र्यांवर नसबंदीची शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. मात्र, कुत्र्यांवर शस्त्रक्रिया केल्यानंतर देखील त्यांची संख्या वाढत असल्याचा विरोधाभास दिसून येत आहे. वडगाव शेरी, कल्याणीनगर, खराडी, चंदननगर येथील अनेक चौकांत हे दिसून येत असून, ते वाहनांचा पाठलागत करीत आहेत. तसेच पादचार्यांच्या अंगावरदेखील धावून जात आहेत. अनेकदा रात्री रस्त्यावरून जाणार्या नागरिकांना ही कुत्री त्रास देतात. लहान मुलांवर देखील ही कुत्री हल्ला करीत आहेत.

पुणे स्टेशन परिसरात प्रवाशांची लूट; कारवाई करण्याची मागणी

पुणे । प्रतिनिधी

पुणे स्टेशन परिसरात असलेल्या महापालिकेच्या तुकाराम शेठ शिंदे वाहनतळ सध्या खासगी वाहनांच्या विळख्यात अडकले आहे. आरटीओ आणि संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षाने या ठिकाणी खासगी वाहनांतून प्रवाशांची अनधिकृत वाहतूक होत आहे. या वाहनचालकांकडून प्रवाशांची आर्थिक लूट होत आहे. यामुळे अवैध प्रवासी वाहतूक करणार्या वाहनचालकांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

या वाहनतळाच्या पार्किंगच्या जागेत पीएमपी बसस्थानक असून, या ठिकाणी प्रवाशांची नेहमी गर्दी असते. मात्र, या

ठिकाणी खासगी वाहनांतून प्रवाशांची वाहतूक मोठ्या प्रमाणात केली होत आहे. पुणे-मुंबईदरम्यान खासगी वाहतूक करणार्या एजंटांकडून पीएमपी आणि एसटी बसचालकांना अरेरावी केली जात आहे. पीएमपी आणि एसटी बसना स्थानकात प्रवेश करताना खासगी वाहनचालकांच्या वाहनांचा मोठा अडथळा होत आहे. प्रवासी एसटीने जाण्यासाठी स्थानकात प्रवेश करताच एजंटांचा त्यांना गराडा पडत असून, खासगी वाहनांतून प्रवास करण्यास त्यांना भाग पाडले जात आहे.

पांढरी नंबर प्लेट असणार्या खासगी वाहनांतून प्रवाशांची सर्रासपणे पुणे-मुंबईदरम्यान वाहतूक केली जात आहे. मोटार वाहन कायद्यानुसार प्रवास वाहतूक करण्यासाठी वाहनाला पिवळ्या क्रमांकाची नंबर प्लेट आवश्यक असते, म्हणजेच ते वाहन प्रवासी वाहतूक करणाच्या नियमात बसणारे असते. मात्र, खासगी पांढरी नंबर प्लेट असलेल्या वाहनचालकांकडून मोटार वाहन कायद्याला केराची टोपली दाखवली जात आहे. याकडे वेळीच प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

पोहत पाठलाग करून दारू विक्रेत्याला पकडले

पुणे । प्रतिनिधी

पुणे-पानशेत रस्त्यावरील ओसाडे येथील खडकवासला धरणतीरावर बेकायदा गावठी दारू विक्री धंद्यावर वेल्हे पोलिसांनी धाड टाकली. त्या वेळी मुद्देमाल जागेवर सोडून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात उडी मारून पलायन करणार्या सराईत दारू विक्रेत्याला पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब पडळकर यांनी अंगावरील कपड्यांनिशी पोहत पाठलाग करून जेरबंद केले.

तब्बल अर्धा-पाऊण तास रंगलेले थरारनाट्य पाहून परिसरातील नागरिक अचंबित झाले. पडळकर यांच्या साहसी कामगिरीचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले आहे. अभिमन्यू ईश्वर नानावत (रा. ओसाडे, ता. राजगड) असे अटक केलेल्या दारू विक्रेत्याचे नाव आहे. याप्रकरणी वेल्हे पोलिस ठाण्यात

गुन्हा दाखल केला आहे.

ओसाडे येथील धरणतीरावर राजरोसपणे बेकायदा दारू विक्री करणार्या दारू धंद्यावर वेल्हे पोलिसांनी शनिवारी (दि. ११) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास धाड टाकली. पोलिस आल्याची माहिती मिळताच नानावत याने खडकवासला धरणाच्या पाणलोटात उडी मारली. तो धरणात पोहत पलीकडील सांगरुण गावच्या तीराकडे पळून चालला होता. त्या वेळी क्षणाचाही विलंब न करता पडळकर यांनी अंगावरील कपड्यांसह धरणात उडी मारली. वेगाने पोहून पाठलाग करीत नानावत यास धरणाच्या मध्यभागीच जेरबंद केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बेकायदा दारू धंद्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी धडक मोहीम हाती घेतली आहे. असे असले तरी ओसाडे येथे धरणतीरावर आडबाजूला राजरोसपणे गावठी दारू विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर सहायक पोलिस निरीक्षक नितीन खामगळ यांच्या मार्गदर्शनाखाली पडळकर, सहाय्यक फौजदार राजाराम होले, पोलिस हवालदार पंकज मोघे, मयूर जगताप यांच्या पथकाने ही कारवाई केली.

ठाकरे गटाचे शहराध्यक्ष सचिन भोसले यांना अटक

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी ईव्हीएम मशीन चुकीच्या पद्धतीने लावल्याचा आरोप करत शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहराध्यक्ष सचिन भोसले यांनी गोंधळ घातला. त्यामुळे सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करीत भोसले यांना तत्काळ अटक करण्यात आली आहे. ही घटना सोमवारी (दि. १३) सकाळी थेरगाव येथे घडली.

मावळ लोकसभा मतदारसंघासाठी आज सकाळी मतदान सुरु झाले. दरम्यान, शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) शहराध्यक्ष सचिन भोसले थेरगाव येथील नागु बारणे शाळेत मतदानाचा हक्क बजावण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना ईव्हीएम मशीन चुकीच्या पद्धतीने लावल्याचे दिसले. याचा जाब विचारत त्यांनी मोबाईलमध्ये चित्रीकरण केले.

मात्र, मतदान केंद्रात चित्रीकरण करण्यास बंदी असल्याने निवडणूक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना अडवले. त्यावेळी त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. दरम्यान, पोलिसांनी भोसले यांना ताब्यात घेत त्यांच्या विरोधात वाकड पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास वाकड पोलिस करत आहेत.

आळेफाटा उपबाजारात कांदा दरात घसरण : शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच

पुणे । प्रतिनिधी

जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आळेफाटा उपबाजारात शुक्रवारी (दि. १०) झालेल्या लिलावात कांदादरात घसरण झाली. लिलावात प्रतिदहा किलो कांद्याला २०१ रुपये दर मिळाल्याची माहिती सभापती संजय काळे व संचालक नबाजी घाडगे यांनी दिली. केंद्र सरकारने शनिवारी (दि. ४) कांदा निर्यात काही अटींवर खुली केली. पावणेपाच महिन्यांनंतर कांदा निर्यात खुली केल्यावर दरात वाढ झाली. यामुळे मंगळवारी आळेफाटा उपबाजारात कांद्याची उच्चांकी आवक झाली. परिणामी, पुन्हा दरात घसरण झाली व शेतकर्यांच्या पदरी निराशाच पडली.

दोनशे रुपयांवर मिळालेले कमाल दर पुन्हा दोनशे रुपयांवर आले. दरम्यान, आळेफाटा उपबाजारात शुक्रवारी कांद्याची चांगली आवक झाली. दरातील या घसरणीमुळे आळेफाटा उपबाजारात कांदा विक्रीस आलेले शेतकरी चांगलेच हवालदिल झाले. दरम्यान, दर असेच राहिल्यास येथील कांदा आवकही घटणार आहे. शुक्रवारी झालेल्या लिलावात शेतकर्यांनी २८ हजार ९०० कांदा गोणी विक्रीस आणल्याची माहिती बाजार समितीचे सचिव रूपेश कवडे व कार्यालयप्रमुख प्रशांत महाम्बरे यांनी दिली.

कांद्याला प्रतिदहा किलोस मिळालेले दर

एक्सट्रा गोळा : १८० ते २०१ रुपये
सुपर गोळा : १६० ते १८० रुपये
सुपर मीडियम : १४० ते १६० रुपये
गोल्टी व गोल्टा : १०० ते १३५ रुपये
बदला व चिंगळी: ३० ते ११० रूपये

एक्सट्रा गोळा : १८० ते २०१ रुपये
सुपर गोळा : १६० ते १८० रुपये
सुपर मीडियम : १४० ते १६० रुपये
गोल्टी व गोल्टा : १०० ते १३५ रुपये
बदला व चिंगळी: ३० ते ११० रूपये

बंधारे भरण्यासाठी भामा आसखेडमधून सोडले पाणी

पुणे । प्रतिनिधी

खेडच्या भामा आसखेड धरणातून १ हजार क्युसेकने भामा नदीपात्रात विसर्ग सुरू करण्यात आला आहे. या पाण्यातून तालुक्यातील भीमा व भामा नदीवरील १० बंधारे भरणार आहेत. तसेच, या पाण्याचा फायदा उन्हाळी पिकांसह विविध गावांतील पाणीपुरवठा योजनांना होणार आहे. उन्हाळी पिकांसाठी तालुक्यातील शेतकर्यांनी धरणातून पाणी सोडण्याची मागणी केली होती. या मागणीनुसार भामा आसखेड धरण उपविभागाचे सहाय्यक अभियंता अश्विन पवार यांनी सूचना करताच धरणाच्या आयसीपीओमधून पाणी सोडण्यात आले.

या पाण्यामुळे खेड

तालुक्यातील भामा व भीमा नदीवरील सिद्धेगव्हाणपर्यंतचे १० कोल्हापुरी पद्धतीचे १० बंधारे भरले जाणार आहेत. या पाण्याचा फायदा शेती पिकांना आणि नदीकाठावरील गावच्या पाणी योजनांना होणार आहे. पाणी सोडल्यामुळे शेतकरीवर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. हे पाणी थोपटवाडी, शेलू, आसखेड, चांदुस, पिंपरी बुद्रुक व संतोषनगर, वाकी खुर्द बंधार्यापर्यंत आले असून, पुढील बंधार्यात जात आहे. दरम्यान, धरणातून पाणी सोडल्यानंतर नदीकाठच्या शेतकर्यांना सावध राहण्याच्या सूचना धरण प्रशासनाने दिल्या आहेत.

भामा आसखेड धरण ८.१४ टीएमसी क्षमतेचे असून, सध्या धरणात रविवारी (दि. १२) १.७७ टीएमसी पाणीसाठा आहे. सध्या धरणातील पाण्याची पातळी ६५६.४० द.ल.घ.मी. आहे. एकूण पाणीसाठा ६३.६५४ द.ल.घ.मी., तर धरणाचा उपयुक्त पाणीसाठा ५०.१३२ द.ल.घ.मी. आहे. धरणात फक्त २३ टक्के पाणीसाठा आहे. धरणातील पाण्याचा फायदा भामा-भीमा नदीवरील सर्व बंधारे भरल्यानंतर विसर्ग बंद करण्यात येणार असल्याची माहिती धरण विभागाचे शाखा अभियंता नीलेश घारे यांनी दिली

'सोयाबीनचे घरचे बियाणे वापरा' मोहीम; विभागीय कृषी सहसंचालकांची माहिती

पुणे । प्रतिनिधी

आगामी खरीप हंगामात सोयाबीन ग्राम बीजोत्पादन कार्यक्रमांतर्गत 'घरचे बियाणे' मोहीम राबविण्यात येत आहे. त्यादृष्टीने तालुका कृषी अधिकारी कार्यालयांना सूचना देण्यात आल्या असून, गावपातळीपर्यंत या मोहिमेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत; जेणेकरून सोयाबीन बियाणे खरेदीमधील शेतकर्यांची रक्कम वाचून अधिकाधिक क्षेत्र या पिकाखाली आणण्यास प्राधान्य देण्यात येत असल्याची माहिती पुणे विभागीय कृषी सहसंचालक रफिक नायकवडी यांनी दिली. पुणे जिल्ह्यातील सोयाबीन पिकाखालील सरासरी

क्षेत्र ४७ हजार २३० हेक्टर इतके आहे.

मागील तीन खरीप हंगामांत सोयाबीन बियाण्यांची सरासरी ८ हजार ५८० क्विंटल इतकी विक्री झालेली आहे. त्यादृष्टीने नियोजन करता खरीप २०२४ मध्ये १२ हजार ७५ क्विंटल सोयाबीन बियाण्यांची आवश्यकता अपेक्षित आहे. कृषी विभागाने केलेल्या नियोजनानुसार महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) आणि राष्ट्रीय बियाणे महामंडळाकडून (एनएससी) मिळून २ हजार ५२० क्विंटल, तर खासगी बियाणे कंपन्यांकडून ९ हजार ५५५ क्विंटल इतक्या सोयाबीनचा पुरवठा अपेक्षित आहे.

पुणे जिल्ह्यात सोयाबीन पिकाखालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. वाढत्या क्षेत्राचा विचार करून गुणवत्तापूर्ण बियाण्यांची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने खरीप २०२३ प्रमाणेच यंदाच्या खरीप २०२४ मध्येही घरचे बियाणे मोहीम राबवून सोयाबीनचे बियाणे शेतकर्यांनी घरचेच वापरासाठी प्रचार-प्रसिध्दी करण्यात येत आहे. ज्याचे स्वरूपही व्यापक करून जास्तीत जास्त शेतकर्यांचा सहभाग त्यामध्ये वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.